बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक ५० | बुधवार,दि.१६ नोव्हेंबर २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# रस्त्यांवर धूळ; नागरी आरोग्य धोक्यात

**गोंदिया:-** यंदा पाऊस मोठ्या प्रमाणात पडला आहे. यामुळे शहरातील जवळपास सर्व मुख्य रस्त्यांवर खड्डेच खड्डे पडलेले होते. मात्र मागील काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतल्यामुळे आता या खड्ड्यांमधून उडणारी धूळ यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. तर दुसरीकडे लोकसंख्या देखील दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे शहरातील रस्त्यांवर वाहनांची संख्या देखील प्रचंड वाढली आहे. यामुळे अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी होण्याचे प्रकार वाढले आहे तर दुसरीकडे शहरातील अनेक मुख्य रस्त्यांवर खड्ड्यांमधून निर्माण होणारे धूळ हे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण करणारी ठरत आहे. धुळ डोळ्यांमध्ये जाते त्यामुळे डोळ्यांचे आजार देखील वाढल्याचे तज्ञांचे म्हणणे आहे.

शहरातील अत्यंत वर्दळीचा समजल्या जाणाऱ्या अग्रसेन गेट ते सिंधी कॉलनी-मुर्री, जयस्तंभ चौक ते जिल्हा परिषद चौक मार्गावर पडलेल्या खड्ड्यामुळे व बालाघाट टी पॉईंट ते तिरोडा मार्गाचे बांधकाम सुरू असल्याने खोदकाम केलेल्या रस्त्यावर धुळ



उडण्याचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. विशेषत: या मार्गावरील असलेली कार्यालये, व्यापारी प्रतिष्ठाने, रुग्णालय व रहिवासीयांना सर्वात मोठा फटका बसत आहे. ही उडणारी धुळ थेट श्वासाद्वारे फुफ्फुसात जात असल्यामुळे रुग्णांच्या संख्येत वाढ होऊ लागली आहे. या खोदकाम केलेल्या रस्त्यावर बांधकाम पूर्ण होईपर्यंत पाणी घालणे अत्यंत गरजेचे झाले असताना याकडे रस्ता कंत्राटदाराने दुर्लक्ष केले आहे.त्यातच शहरातील रस्त्यांवर पडलेले खड्डे दुरुस्तीकडे नगरपरिषदेचेही दुर्लक्ष झाल्याने मोठ्या प्रमाणात उडणारी ही धुळ अधिकाऱ्यांना ही दिसत नसावी काय, असा प्रश्न नागरिक विचारीत आहेत.

राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबविण्यात येत आहे. तेच अभियान गोंदिया नगरपरिषद व जिल्ह्यात सर्वत्र स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून राबवण्यात येत आहे. ध्वनीक्षेपनाद्वारे मोठ्या प्रमाणात चौकाचौकात विविध वार्डावार्डात घंटागाडीच्या माध्यमातून स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात येत आहे. रस्त्याच्या कडेला टाकण्यात आलेला कचरा नगरपरिषदेचे आरोग्य विभागाचे कर्मचारी कचरा उचलून ट्रॅक्टर ट्रॉलीत भरुन हिरडामाली येथील कचराडेपोत व गोंदियातील स्मशानभूमी शेजारी आणून टाकतात. रोज कचरा टाकल्याने मोठ्या प्रमाणात कचऱ्यांचे ढीग साचतात जास्त प्रमाणात कचरा साठत असल्याने त्याला नष्ट करण्यासाठी तो जाळण्यात येत आहे. धुराच्या प्रदूषणाने परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ओला-सुखा कचरा जळत असल्याने दुर्गंधी सुटत आहे. ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना स्वसनाचे विकार जडत आहे. यामुळे एकीकडे गावपरिसरात स्वच्छता अभियान तर दुसरीकडे कचराडेपो परिसरात नागरिकांचे आरोग्य धोक्यात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. नगरपरिषदेने कचरा डेपोतील कचरा न जाळता योग्य ती उपाययोजना करावी, अशी परिसरातील नागरिकांची मागणी आहे.

## धूर व धुळीमुळे आरोग्याला धोका

**गोंदियाच्या प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. तसेच धुळीचे प्रमाणही वाढत आहे. त्यामुळे फुफुसाचे व लिव्हरचे विकार उद्भवत आहेत. अनेकांना अस्थमाचादेखील त्रास जाणवत आहे. धुळीमुळे शहरवासीयांना डोळ्याचे विकारदेखील होऊ शकतात. गोंदियात नेमके प्रदूषण किती हे माहिती नाही. आजपर्यंत याची गरज भासली नाही.प्रदूषण स्थितीचा नेमका अंदाज काढण्यासाठी मला आकडेवारीचा अभ्यास करावा लागणार आहे.**

पर्यावरण आणि स्वच्छतेच्या मानकांत मागे असलेला गोंदिया शहराला आता प्रदूषणाच्या विळख्याशी झुंजावे लागणार आहे. शहरात दररोज अंदाजे १ लाख वाहनांमध्ये मिळून साधारण हजार लिटर डिझेल-पेट्रोलचा वापर होतो. यामुळे निर्माण होणारा धूर शहरातील किती लोकांच्या आरोग्यावर परिणाम करत असेल याची केवळ कल्पनाच करणे शक्य आहे. दुसऱ्या बाजूने विचार करायचे तर गोंदियाकरांच्या श्वासात ऑक्सिजन नव्हे केवळ धूरच जातो. या स्थितीत आपण थोडे जरी बदलायचे ठरवले तरी यातून आपली सुटका होणे शक्य आहे. मात्र, यासाठी गॅसवर चालणाऱ्या वाहनांचाच वापर व्हायला हवा. वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमीत कमी असावे, यासाठी सीएनजीचा वापर होण्याची आवश्यकता असली, तरी अद्याप त्या दिशेने शहराचे पाऊल पडलेले नाही. वाहनांमुळे होणारे प्रदूषण टाळण्याचे विविध उपाय हाती घेण्याची गरज आहे.

प्रदूषणाचे तोटे, नुकसान प्रदूषणाचा सर्वात मोठा फटका नागरिकांच्या आरोग्याला बसतो. वाहतूक पोलिस, रस्त्यावरील व्यावसायिक आणि लहान मुले हे या प्रदूषणाचे बळी ठरत आहेत, असे आरोग्यतज्ज्ञांचे मत आहे.

वाहनांमुळे शहरात प्रदूषण वाढते आहे. गंभीर बाब म्हणजे श्वसनाचे विकार आणि डोळ्यांचे आजारही वाढले आहेत. प्रदूषित वातावरणात सतत राहणाऱ्यांना श्वसनाचे गंभीर आजार होतात. हे रुग्ण आता वाढत आहेत. त्याशिवाय शहराला होणारा आर्थिक तोटाही महत्त्वाचा आहे.

# नक्षलवाद्यांच्या श्रद्धांजली पत्रकातून अक्कू यादव हत्याकांडाचा खुलासा



**गोंदिया:** गडचिरोली जिल्ह्यात मागील वर्षी १३ नोव्हेंबरला झालेल्या मर्दीनटोला चकमकीला एक वर्ष पूर्ण झाले आहे. जहाल माओवादी मिलींद तेलतुंबडेसह २७ माओवाद्यांना कंठस्नान घालणाऱ्या गडचिरोली पोलिसांच्या या यशस्वी चकमकीनंतर उत्तर गडचिरोलीमध्ये माओवादी संघटनेला मोठा हादरा बसलेला आहे. वर्षभरात केवळ दोन घटना घडल्या. या पलीकडे माओवाद्यांना प्रतिउत्तरात फारसे काही करता आले नाही. त्यामुळे दंडकारण्यात पोलिसांचा दबदबा कायम असल्याचे दिसत आहे.

नागपुरातील कुख्यात गुंड अक्कू यादव याची २००४ मध्ये जिल्हा सत्र न्यायालयात महिलांनी सामूहिक हत्या केली होती. या हत्याकांडाच्या मागे नक्षलवाद्यांची प्रेरणा असल्याचा उल्लेख नक्षलवाद्यांनी जारी केलेल्या श्रद्धांजली पत्रकात असून अनेक खळबळजनक खुलासे करण्यात आले आहे.

नक्षलवाद्यांच्या केंद्रीय कमिटीचा वरिष्ठ सदस्य आणि महाराष्ट्र, मध्य प्रदेश व छत्तीसगडच्या नक्षलवाद्यांच्या स्पेशल झोनल कमिटीचा सचिव मिलिंद तेलतुंबडेच्या पोलीस एन्काऊंटर मधील मृत्यूला एक वर्ष पूर्ण झाले आहे. नक्षलवाद्यांकडून गडचिरोलीतील मर्दिनटोलाच्या जंगलात १३ नोव्हेंबर २०२१ रोजी पोलीस एन्काऊंटरमध्ये मारल्या गेलेल्या सर्व २७ नक्षलवाद्यांना एका पत्रकाच्या माध्यमातून श्रद्धांजली वाहिली आहे. एकूण ६५ पानांच्या या पत्रकामध्ये नक्षलवाद्यांनी अनेक धक्कादायक खुलासे केले आहे.

**मर्दीनटोला चकमकीच्या घटनेच्या एक वर्ष पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभुमीवर माओवाद्यांनी मिलींद तेलबुंडेसह २७ माओवाद्यांच्या जीवनावर संपूर्ण माहिती देणारे एक पुस्तिका जारी केली आहे. यात गेल्या पंधरा वर्षात सुरक्षा दलांनी राबविलेल्या मोठ्या अभियानावर माओवाद्यानी तीव्र शब्दात टीका केली आहे.**

अक्कू यादवची हत्या करणाऱ्या महिलांना नक्षली नेता मिलिंद तेलतुंबडेची प्रेरणा होती. महिलांनी त्यांच्या विरोधात होणाऱ्या अत्याचार विरोधात पेटून उठावे, या मिलिंद तेलतुंबडे याच्या शिकवणीतून प्रेरणा घेऊनच ही घटना घडली होती असा दावा या पत्रकात करण्यात आला आहे. अक्कू यादव या कुख्यात गुंडाची कोर्टाच्या आवारात महिलांनी सामूहिक हत्या केली होती. अक्कू यादव विरोधात गंभीर गुन्हे दाखल होते. एवढेच नाही तर १९९८ मध्ये मुंबईतील घाटकोपर येथील रमाबाई नगर परिसरात झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर तसेच २००६ मध्ये झालेल्या खैरलांजीच्या दुर्दैवी घटनेनंतर महाराष्ट्रात निर्माण झालेल्या सामाजिक तणावामागेही नक्षलवाद्यांनी कॉम्रेड मिलिंद तेलतुंबडेच्या नेतृत्वात हिंसेला प्रोत्साहन देण्याचे काम केले होते, हेही या पत्रकात मान्य करण्यात आले आहे. अक्कू यादव हत्या प्रकरण आणि महाराष्ट्रात घडलेल्या काही हिंसक आंदोलनात नक्षलवाद्यांचा हात असल्याचे पोलिसांच्या तपासात यापूर्वीच समोर आले होते. मात्र, आता खुद्द नक्षलवाद्यांनी पत्रकाच्या माध्यमातून पोलिसांना दुजोरा दिला आहे.

माओवाद्यांच्या या शेल्टर झोनमध्ये माओवाद्यांचे कंपनी चार दलमसह बडे नेते वास्तव्याला असल्याची माहिती तत्कालीन पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांना मिळाली होती. त्यानुसार रात्रीच्या सुमारास गडचिरोली येथून सी ६० कमांडोची सोळा पथके अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या नेतृत्वात घटनास्थळी पाठविली. मध्यरात्रीच्या सुमारास घटनास्थळाचा सात किलोमीटर अलीकडे ही पथके पोचली. त्यानंतर तिथून त्यांनी घनदाट जंगल आणि पहाडीमधून पायी प्रवास केला. पहाटे पाच ते सहाच्या दरम्यान ही पथके जंगलाच्या मध्यभागी माओवाद्यांचा वास्तव्य असलेल्या ठिकाणी पोहोचली. माओवाद्यांना ३०० जवानांनी घेराव टाकला. जवानांचा वेढा पडताच माओवाद्याच्या संत्रीने गोळीबार केला. जवानांनी प्रत्युतर दिले. तब्बल दहा तास ही चकमक झाली होती.

दरम्यान या चकमकीनंतर माओवाद्यांचे मनोधैर्य ढासळले आहे. माओवाद्यांचा जनसंपर्क कमी झाल्याने नागरिकांची सहानुभुती गमावली असल्याचे गडचिरोली परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक संदीप पाटील म्हणाले.

## मंत्री राठोड प्रकरणी न्यायालयीन लढाई सुरूच ठेवणार; वाघ

**गोंदिया-** पूजा चव्हाण आत्महत्याप्रकरणी राज्याचे अन्न व औषध प्रशासनमंत्री संजय राठोड यांच्याविरोधात आपला न्यायालयीन लढा सुरूच ठेवणार असल्याचे भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी येथे स्पष्ट केले. सध्या विदर्भ दौऱ्यावर असलेल्या चित्रा वाघ महिला मेळाव्यानिमित्त गोंदियात आल्या होत्या. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.महिनाभरापूर्वी एटापल्ली तालुक्यातील येलचील परिसरात एका आदिवासी महिलेवर ट्रक चालकाने केलेला बलात्कार दुर्दैवी असून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाईसाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही चित्रा वाघ यांनी दिली. सोबतच पीडित महिलेला शासकीय मदत मिळवून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.तसेच जितेंद्र आव्हाड यांनी राजीनाम्याची धमकी देऊन न्यायव्यवस्थेवर दडपण आणण्याचा प्रयत्न करु नये असे म्हणत संविधानावर विश्वास आहे,तर सामोरे जाण्याचे आवाहन केले.राज्यातील सरकारमुळे महिला सुरक्षित असल्याचेही म्हणाल्या.

# अहिंसा व एकात्मतेसाठी धावली तरुणाई,पोलीस दलाच्या अहिंसा दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद

**गोंदिया :** "बिरसा मुंडा जयंती" निमित्त गोंदिया जिल्हा पोलीस दलातर्फे आयोजित अहिंसा दौडला जिल्हाभरातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभला असून थंडीच्या साक्षीने अहिंसा व एकात्मतेसाठी जिल्ह्यातील तरुणाई स्वयंस्फूर्तीने धावली. जिल्हा क्रीडा संकुलाचे भव्य मैदान युवक युवतींनी फुलून गेले होते. तीन टप्प्यात घेण्यात आलेल्या या स्पर्धेत २१ किमी पुरुष गट लीलाराम बावणे, महिला गट सुषमा रहांगडाले, १० किमी पुरुष गट निखार भलावी, महिला गट सोनिया लिल्हारे व ३ किमी रन अँड वॉक पुरुष गट नागेश देवकर व महिला गटात पूजा येडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली अतिशय कमी वेळेत या स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले.

अहिंसा दौड स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन जिल्हाधिकारी नयना गुंडे यांच्या हस्ते सकाळी पाच वाजता करण्यात आले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अरविंद वानखेडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक




निखिल पिंगळे, उपवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र जयरामेगौडा आर., सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी देवरी अनमोल सागर, मुख्य न्यायदंडाधिकारी ए. व्हि. कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर, जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

अहिंसा हे दुर्बलांचे नाही तर सबलांचे प्रतिक असून 'अहिंसा परमो धर्म' आहे. या विषयाच्या अनुषंगाने अहिंसा दौड ही महत्वपूर्ण पाऊल आहे. या भव्य व नियोजनबद्ध आयोजनासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक व पोलीस दल अभिनंदनास पात्र आहे, असे जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात सांगितले. तर या स्पर्धेतून अहिंसा व एकात्मता हे महत्वाचे संदेश देणारी ही दौड असून हाच व्यापक संदेश स्पर्धक या ठिकाणाहून घेऊन जातील अशी अपेक्षा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अरविंद वानखेडे यांनी व्यक्त केली.

जिल्हा पोलीस दलातर्फे क्रीडा संकुल, मरारटोली, गोंदिया येथे १८ वर्षावरील युवक-युवतीकरीता २१ कि.मी. हाफ मॅरेथॉन, १६ वर्षावरील युवक-युवतीकरीता १० कि. मी. मॅरेथॉन व आमंत्रित अतिथीकरीता ०३ कि.मी. रन अँड वॉक या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी हिरवी झेंडी (फ्लॅग ऑफ) दाखवून स्पर्धेचे उद्घाटन केले.

**स्पर्धेचे विजेते :-** २१ किमी पुरुष गट – प्रथम क्रमांक लीलाराम बावणे, द्वितीय क्रमांक सनी पुसाटे, तृतीय क्रमांक विजय चुटे. महिला गट- प्रथम क्रमांक सुषमा रहांगडाले, द्वितीय तेजस्विनी लांबकाने तृतीय क्रमांक वैशाली मडावी. १० किमी पुरुष गट प्रथम क्रमांक निखार भलावी, द्वितीय क्रमांक मनीष मेश्राम व तृतीय क्रमांक मिलिंद कोवे, महिला गट- प्रथम क्रमांक सोनिया लिल्हारे, द्वितीय क्रमांक हर्षा मडावी, तृतीय क्रमांक लक्ष्मी गमे, ३ कि.मी. रन अँड वॉक पुरुष गट प्रथम क्रमांक नागेश देवकर, द्वितीय क्रमांक रुपेश सुलाखे, तृतीय क्रमांक कृष्णा बिसेन, महिला गट- पूजा येडे, द्वितीय क्रमांक कोमल उके व तृतीय क्रमांक चेतना बावनकर यांनी पटकाविला. विजेत्या स्पर्धकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पदक व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना पदक देण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन देविदास कठाळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर यांनी मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संपूर्ण पोलीस दल व जिल्हा प्रशासनाने परिश्रम घेतले.

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे अहिंसा दौडमध्ये ३ कि.मी. रन अँड वॉक गटात ८० वर्षीय मुन्नालाल यादव यांनी स्वयंस्फूतीने सहभाग घेऊन ३ कि.मी. अंतर पूर्ण केले. जिल्हाधिकारी नयना गुंडे व उपस्थित पाहुण्यांनी यादव यांचे विशेष कौतुक केले. स्पर्धेत सहभागासाठी त्यांना विशेष पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

# जीएमसी बांधकामाची टेंडर प्रक्रिया बेकायदेशीर

## कामाला स्थगिती : सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेविनाच कारभार



**गोंदिया:** येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय तसेच विविध इमारतींच्या बांधकामाला २०१५ साली मान्यता देण्यात आली. कुडवा आवारात सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्यात आले. मुख्य इमारत बांधकामासाठी निविदा काढण्यात आली. मात्र निविदा प्रक्रिया पार पाडताना केंद्र शासनाच्या विविध मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात आले नसून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमांना देखील सुसंगत प्रक्रिया करण्यात आली नाही. त्याच प्रकारे सक्षम प्राधिका?याची मंजूरी देखील घेण्यात आली नाही. त्यामुळे निविदा प्रक्रियाच वादात अडकली. अखेर निविदा आणि बांधकाम पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात आले आहे.

गोंदिया जिल्हा मागासलेला आहे. नक्षलग्रस्त आणि सिमावती भागात हा जिल्हा असल्यामुळे येथे आरोग्याच्या सोयी असणे गरजेचे आहे. त्याउद्देशाने तत्कालीन सर्वपक्षीय नेत्यांनी पुढाकार घेत गोंदियात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला मंजुरी मिळावी यासाठी प्रयत्न केले. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण मिळावे, हा देखील त्यामागचा हेतू होता. शासकीय आणि प्रशासकीय बाजूने जोर लावल्यामुळे अखेर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला मंजुरी मिळाली. मात्र त्यात देखील पेच निर्माण झाला होता. अखेर न्यायालयीन लढा दिल्यानंतर मंजुरीची रितसर प्रक्रिया पार पडली. २०१५ मध्ये वैद्यकीय महाविद्यालयाला मंजुरी मिळाली. १०० विद्यार्थी क्षमता आणि ५०० खाटांचे रुग्णालय येथे मंजूर करण्यात आले. ६ एप्रिल २०१६ ला प्रशासकीय मान्यता देण्यात आली. १५ जुलै २०२१ रोजी कुडवा येथील प्रस्तावित जागेवर इमारतीचे बांधकाम

### नेते मंडळीत श्रेयवादातच खूष

**गोंदियात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येणे ही आनंदाची बाब आहे. त्याचे सर्व स्तरातून कौतूक करून आनंद व्यक्त करण्यात आला. त्याचे श्रेय देखील अनेकांनी लाटले होते. अद्यापही ती श्रुंखला कायम आहे. मात्र असे व्यत्यय वारंवार इमारत बांधकामात येत असताना ते कायमस्वरुपी सुटावेत, याकरिता प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्याकडे मात्र नेतेमंडळींनी दुर्लक्ष केले आहे.**

सार्वजनिक उपक्रम कंपन्यांच्या माध्यमातून टर्न तत्वावर करण्याचे निर्देश देण्यात आले. ७ जानेवारी २०२२ रोजी वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून इंजिनिअरिंग प्रोजेक्टस इंडिया लिमिटेड या कंपनीची नियुक्ती करण्यात आली. कंपनीने कुडवा येथील जागेची पाहणी केली.

३० मार्च २०२२ रोजी कुडवा येथे नवीन बांधकाम करण्याकरिता ६८.९० कोटी एवढी रक्कम व्यवस्थापन सल्लागार समितीला वळती करण्यात

### संरक्षण भिंती बांधकामातही रोडा

**इंजिनिअरिंग प्रोजेक्ट इंडिया या व्यवस्थापन कंपनीशी वारंवार चर्चा आणि बैठका शासन स्तरावर पार पडल्यानंतर २९ जून २०२२ रोजी वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव यांनी महाविद्यालयाच्या प्रस्तावित जागेवर संरक्षण भिंत बांधण्यासंदर्भात परवानगी देण्यात आली. १९ ऑगस्ट २०२२ रोजी संरक्षण भिंत बांधण्यास सुरूवात करण्यासाठी आदेश देण्यात आला. तर ३० रोजी बांधकामाला सुरूवात करण्यात आली. मुख्य नकाशात बदल करण्यात आल्यामुळे या बांधकामात देखील त्याचा रोडा निर्माण झाला.**

आली. ३० ऑगस्ट २०२२ रोजी कुडवा येथील प्रस्तावित जागेवर संरक्षण भिंत बांधकामाला सुरूवात करण्यात आली. ही सर्व प्रक्रिया पार पडत असताना दुसरीकडे मात्र केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालनच करण्यात आले नसल्याची बाब राज्य शासनाच्या निदर्शनास आली. ऑक्टोबर महिन्यात करण्यात आलेली निविदा प्रक्रियाच चुकीच्या पद्धतीने करण्यात आल्याचा ठपका शासनाने ठेवला आहे. त्यामुळे जी निविदा प्रसिद्ध करण्यात आली. त्यात निविदेला सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेण्यात आली नाही. केंद्र शासनाच्या आर्थिक धोरणांचे उल्लंघन करण्यात आले.

विविध मार्गदर्शक सूचना तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमांना अनुसरून निविदा प्रसिद्ध केली नसल्याचा ठपका ठेवत ही बाब अतिशय गंभीर असल्याचा शेरा अवर मुख्य सचिवांनी ठेवला. त्यामुळे प्रसिद्ध करण्यात आलेली निविदा आणि त्यासंदर्भातील कामांना पुढील कामांना तत्काळ प्रभावाने स्थगिती देण्यात आली आहे. हे पत्र १३ ऑक्टोबर २०२२ रोजी अपर सचिव महादेव जोगंदळ यांनी निर्गमित केले.

वारंवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामात अडथळे येत आहेत. त्यामुळे अडथळ्यांची ही मालिका संपुष्टात कधी येणार?, सुरळीत बांधकामाला मुहूर्त केव्हा मिळणार आणि वैद्यकीय महाविद्यालय स्वत:च्या इमारतीत प्रत्यक्षात कधी स्थानांतरित होणार, असे विविध प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहेत.

# तलाठ्यांचे असहकार आंदोलन



**गोंदिया:** अर्जुनी मोरगाव तालुक्यातील तलाठी डी.एच.पुस्तोडे यांना शासकीय कर्तव्यावर असताना पोलीस कर्मचाऱ्याने मारहाण करुन उलट एकतर्फी कारवाई करुन गुन्हा दाखल केल्याचा आरोप विदर्भ पटवारी संघाने केला आहे. या घटनेचा संघटनेने निषेध नोंदविला असून तलाठ्याला मारहाण करणाऱ्या पोलीस कर्मचारी व एकतर्फी कारवाई करणाऱ्या पोलीस निरीक्षकावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी, या मागणीला घेवून संघटनेच्यावतीने आज मंगळवारपासून (दि.१५) आंदोलनास सुरवात करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी नयना गुंडे यांना तलाठी संघटनेच्यावतीने निवेदन सादर देण्यात आले.अर्जुनी मोरगाव, सडक अर्जुनी, गोंदिया येथील तहसिलदारांनाही संघटनेच्यावतीने निवेदन सादर करण्यात आले.जिल्ह्यातील सर्व तलाठी काळ्या फिती लावून पोलीस कारवाईचा निषेध नोंदविला. तर यानंतरही कारवाई न झाल्यास बुधवारी सर्व तलाठी व मंडळ अधिकारी आपले डीएलसी टोकण विभाग प्रमुखाकडे जमा करतील. तसेच बेमुदत असहकार आंदोलन करतील. नैसर्गिक आपत्ती व निवडणुकीची कामे वगळता इतर कोणतेही कामे करणार नसल्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

## भारत जोडो यात्रा विदर्भात दाखल; वाशीम जिल्ह्यात यात्रेचे स्वागत



**वाशीम :** काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली निघालेली भारत जोडो यात्रा १५ नोव्हेंबर रोजी सकाळी विदर्भातील वाशीम जिल्ह्यात दाखल झाली. राहुल गांधी यांचे वाशीम जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने स्वागत करण्यात आले. वाशीम -हिंगोली सीमेवरील राजगाव येथे यात्रेचे स्वागत केल्यानंतर ही यात्रा वाशीमकडे मार्गस्थ झाली. काही वेळात बोराळा हिस्से येथे यात्रा पोहोचेल. येथे विश्रांती व भोजन घेतल्यानंतर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे कॉर्नर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेत काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले,आमदार यशोमती ठाकूर, आमदार प्रणिती शिंदे यांच्यासह अनेक नेते, पदाधिकारी सहभागी झाले आहेत. मोठ्या संख्येने नागरिकांचा सहभाग असून उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे.

## संपादकीय

### आर्थिक आरक्षण गरिबांना न्याय देणारे?

पोटाला जात नसते. गरीब आणि धनाढ्य असे दोन वर्ग खरे तर सध्याच्या जागतिकीकरणाच्या आधुनिक काळात अस्तित्वात आहेत. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या समाज घटकांना शिक्षण आणि नोकरीतील संधीमध्ये लाभ मिळावा यासाठी संविधानात आरक्षणाची तरतूद करण्यामागे घटनाकारांना हेतू चांगला होता; परंतु देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होत असताना खुल्या वर्गातील समाजघटक ही मोठ्या प्रमाणात आर्थिक दारिद्र्यात जसा अडकलेला दिसतो.त्याप्रमाणे इतर समाजातील घटकही दारिद्राच्या खाईत गेलेला आहे,त्याला बाहेर काढणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना दहा टक्के आरक्षण देण्याचा निर्णय सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने घेतला.त्याचवेळी या १० टक्के आरक्षणात सवर्ण खुल्यागटातील आर्थिकदृष्ट्या मागासलेलेच नव्हे तर मागास आदिवासी मधील गरिबांनाही त्याचा लाभ मिळायला हवी ही भूमिका घेतली असती तर त्याचे स्वागत खरे ठरले असते.परंतु याठिकाणी एकीकडे ओबीसींना त्यांच्या न्यायीक अधिकार देतांना लोकसंख्येची बाब समोर आणून आरक्षणापासून वंचित ठेवले जात असतनाच खुल्या गटातील या लोकांची कुठेच गणना झालेली नसतानाही कुठल्या आधारावर १० टक्के आरक्षण देण्यात आले याचाही विचार या निमित्ताने का होऊ नये असा सवाल आता उपस्थित होऊ लागला आहे.

या निर्णयामुळे १०३ व्या घटनादुरुस्तीची घटनात्मक वैधता कायम ठेवली आहे. यामुळे देशातील गरिबांना मिळणारे आरक्षण (ईडब्ल्यूएस) हे कायम राहणार असून हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचा मोठा विजय आहे. खरं तर केंद्र सरकारने २०१९ साली आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना दहा टक्के आरक्षण प्रदान केले होते. त्यास तामिळनाडूमधील द्रमुक पक्षासह अनेक संस्था -संघटनांनी विरोध करून त्यास सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या प्रकरणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती उदय लळित, न्या. दिनेश माहेश्वरी, न्या. एस. रवींद्र भट, न्या. बेला त्रिवेदी आणि न्या. जे. बी. पारडीवाल यांच्या घटनापीठासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाद्वारे चार वेगवेगळे निकाल देण्यात आले. त्यापैकी न्या. माहेश्वरी, न्या. त्रिवेदी आणि न्या. पारडीवाला यांनी आरक्षणाच्या बाजूने, तर न्या. भट यांनी विरोधी निकाल दिला. सरन्यायाधीशांनी न्या. भट यांच्या निकालाशी सहमती दर्शविली. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने ३:२ अशा बहुमताने १०३ घटनादुरुस्ती घटनात्मकदृष्ट्या वैध असल्याचा निकाल देऊन आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे दहा टक्के आरक्षण हे कायम ठेवले.

भारतातील जुन्या जातिव्यवस्थेने आरक्षण आणले आणि एससी व एसटी प्रवर्गास समान संधी मिळाल्या. त्यामुळे आता स्वातंर्त्याच्या ७५ वर्षांनंतर परिवर्तनवादी घटनावादाच्या भावनेने आरक्षणावर फेरविचार करण्याची वेळ आली आहे, अशी अतिशय महत्त्वाची टिप्पणी न्या. बेला त्रिवेदी यांनी केली, तर न्या. माहेश्वरी यांनी ईडब्ल्यूएस कोटा हा घटनेचे उल्लंघन करत नसल्याचे स्पष्ट केले.

८ जानेवारी २०१९ रोजी १०३ वी घटनादुरुस्ती लोकसभेत मंजूर झाली होती. ९ जानेवारी २०१९ रोजी राज्यसभेनेही घटनादुरुस्तीला हिरवा कंदील मिळाला होता. १२ जानेवारी रोजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचीही घटनादुरुस्तीवर मोहोर लगावत आरक्षण लागू केले होते; परंतु फेब्रुवारी २०१९ मध्ये या कायद्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. ८ सप्टेंबर २०२२ रोजी सरन्यायाधीश न्या. उदय लळित यांच्या नेतृत्वाखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने अपिलांच्या सुनावणीसाठी नवीन घटनापीठाची स्थापना करण्यात आले होते. १३ सप्टेंबरपासून सर्वोच्च न्यायालयात खटल्याची सुनावणी सुरू झाली. त्यानंतर २७ सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणावरील निर्णय राखून ठेवला होता. काल सर्वोच्च न्यायालयाने ईडब्ल्यूएस आरक्षण वैध असल्याचा निकाल दिला आहे. आर्थिक निकषांवर दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवल्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ही आनंदाची बातमी मानली जाते.

आरक्षण हे आर्थिक निकषांवर असावे यासाठी अनेक घटकांकडून मागणी करण्यात येत होती. एवढेच काय तर हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनीही अनेकदा आरक्षण द्यायचे असेल, तर आर्थिक निकषावर द्या, अशी वारंवार मागणी त्याकाळी केली होती. कालच्या निकालांमध्ये लक्ष वेधून घेण्यासारखी गोष्ट म्हणजे दोन न्यायमूर्तींनी ङ्गदेशाला स्वातंर्त्य मिळवून ७५ वर्ष होऊन गेले तरी आपण आरक्षण वाढवत आहोत आणि आरक्षणाची व्यवस्था संपली पाहिजेङ्घ हे जे विचार मांडले ते स्वागतार्ह आहेत.

प्रत्येक गरिबाला सशक्त केले पाहिजे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे धोरण आहे. आज सर्वोच्च न्यायालयाने ईडब्ल्यूएस कोट्यातील सर्वसाधारण वर्गाच्या आरक्षणालाही मान्यता दिली आहे. शिक्षण आणि सरकारी नोक?्यांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी दहा टक्के ईडब्ल्यूएस आरक्षणाची वैधता ठेवण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हा भारतातील प्रत्येक नागरिकासाठी ऐतिहासिक निर्णय आहे.

या निकालामुळे सामाजिक न्याय आणि गरिबांच्या कल्याणासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ङ्गसबका साथ, सबका विकास, सबका विश्वासङ्घ धोरणावर शिक्कामोर्तब केले आहे, अशा प्रतिक्रिया भाजपच्या नेत्यांकडून व्यक्त करण्यात आल्या आहेत. उदाहरण म्हणून द्यायचे झाल्यास, मुंबईसारख्या शहराचा विचार करता झोपडपट्टीत देवाची पूजा करणारा ब्राह्मण राहतो. दुकानदारी करून उदरनिर्वाह करणारा वैश्य राहतो, तर रोजंदारीसाठी गावाकडून आलेला मराठा समाजातील माथाडी कामगार असो. तोही आर्थिकदृष्ट्या मागासलेला असल्याने त्याच्या कुटुंबीयांना शैक्षणिक आणि नोकरीच्या संधीपासून वंचित राहावे लागत असे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे समाजातील सर्व वर्गातील उपेक्षितांना लाभ होणार असेल, तर या निर्णयाचे स्वागत करायला हवे.

## राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत आदित्यला रौप्य पदक

**गोंदिया:** मुंबई येथे नुकत्याच झालेल्या ३७ व्या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत मूळचा गोंदिया येथील व सध्या नागपूर येथील ऑरेंज सिटी स्पोर्ट शूटिंग अकॅडमी मध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या आदित्य अनंत जगताप ने मेंस युथ गटात रौप्य पदक पटकावले आहे तसेच आगामी काळात केरळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे.



मुंबई येथील वरळीच्या शूटिंग रेंजवर या स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र शूटिंग अकॅडमी तर्फे करण्यात आले होते. अंतिम फेरीत निवड झालेल्या एकूण आठ स्पर्धकांमध्ये आदित्य सहाव्या क्रमांकावर होता, अंतिम फेरीत अत्यंत चुरशीच्या सामन्यात सहा स्पर्धकांना मागे टाकत पुण्याच्या आदित्य मदने यांने सुवर्णपदक तसेच आदित्य जगताप ने रौप्य पदक पटकावले. नागपूर विभागासाठी यावर्षीच्या राज्यस्तरीय शूटिंग स्पर्धेतील एकमेव पदक आदित्य जगताप ने पटकावले हे विशेष. कोच अनिल पांडे यांच्या मार्गदर्शनात आदित्यने हे यश मिळवले आहे.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)**

# मुजोर राजवट विरुद्ध सामाजिक जूट

भारत जोडो यात्रा दक्षिण भारत मजल दर मजल करत महाराष्ट्रात प्रविष्ट झालेली आहे.भारत जोडो यात्रेने दक्षिणेत कमालीची शिखरं गाठली अन ती यात्रा एका राजकीय पक्षाची आता न राहता एका वेगळ्या अर्थाने लोकाभिमुख झाल्याची जाणकारांची मतं पुढे येऊ लागलीत. एका अराजक व्यवस्थेविरुद्ध असलेला जनतेचा क्षोभ यानिमित्ताने व्यक्त होऊ लागल्याचेही समाजमाध्यमांतून दिसू लागले आहे. यात्रेचे केंदबिंदू असलेले राहूल गांधी व त्यांच्या सोबत यात्रेदरम्यान जुळलेले अनेक मान्यवर, सामान्य माणसं, मुलंमुली,तरुण तरुणी,आबालवृद्ध स्त्रिया, सामाजिक चवळवळीतील कार्यकर्ते यांच्या सहभागाने भारत जोडो यात्रेला अनेक आयाम प्राप्त झाले. पक्षपाती प्रसारमाध्यमातून आणि आयटी सेलच्या पंचवीस पैसेवाल्या पोस्टींनी आतापर्यत राहूल गांधींची जी छबी रेखाटली गेली होती त्यापेक्षा फार अफलातून त्यांचे व्यक्तीमत्व प्रत्यक्ष लोकात मिसळताना अनुभवास येत आहे. लोकांसोबतचा संवाद, सहवास, सहप्रवास,अन संवेदनशील सरळ वर्तन समाजमनाला भिडणारे आहे. पप्पू म्हणून त्यांना ज्यांनी हिणवले त्यांच्या कुत्सितपणाचाही समाचार लोकच जरुर घेतील, पण सद्यस्थितीत तरी भारतातील विस्तीर्ण भूमिवर विखुरलेल्या विविधतेला जोडणारी पर्वणी झाली आता ही यात्रा.आणि मुजोर अराजक सत्तेला चित करणारा सक्षम पर्याय उभा होऊ लागल्याचे आशादायी चित्र निर्माण होऊ लागले आहे.

अर्थातच काँग्रेसचे देशभर पसरलेले संघटन, काँग्रेसची मतदानाची टक्केवारी ही जमेची बाजू आहे. जनतेत असलेला सरकारविरोधी रोष, काँग्रेसच्या पथ्यावर पडू शकेल तरी, आतल्या गाठीच्या काँग्रेसजनांबद्दलचं समाजमन चिंताजनक वाटावे अशाही शक्यतेचा अव्हेर करता येणार नाही. अनेक राज्यात प्रादेशिक पक्ष वा स्थानिक पक्षांचा लक्षणीय जनाधार आहे, भाषिक, प्रादेशिक, अस्मिता, जातीय विषमतेमुळे उकल न झालेल्या निम्नजातीय विकासाच्या समस्या व त्यामुळे प्रभावित झालेले जनसमूह या विविध पक्षांची बलस्थाने राहिली आहेत.यात ओबीसी, दलित,आदिवासी, अल्पसंख्यांक समुदायाची अस्वस्थता ध्यानात घ्यावी लागेल. ओबीसीसाठी मंडल आयोग लागू करण्याचे सत्कर्म काँग्रेसच्या हातून होऊ शकले नाही, त्यामुळे काळाच्या ओघात ओबीसी नको त्या ओबीसीहितवैरी-आरक्षणविरोधी शक्तीच्या नजीक सरकला. ओबीसी निर्णायक ठरला. निर्णायक आहे. ओबीसीचा लोकसंख्या प्रमाणात वाटा काँग्रेसने देण्यास ओबीसीला आश्वस्त करावे लागेल.ही यात्रा कन्याकुमारी पासून प्रारंभ झाली. प्रवासात तामिळनाडूचे डीएमके, कर्नाटकात ओबीसीकेंद्रीत जेडीएस, केरळमधील डावे, आंध्रप्रदेश-तेलंगणा तील वायएसआर, तेलगू देसम, टीआरएस वाटेत भेटले असतील त्या पक्षांची जनमानसावर पकड अनुभवाच्या गाठीशी असेल. उर्वरित यात्रेच्या टप्प्यात अन्योन्य अनुभव येतील. गतकालीन युपीए सारखे अनेक समविचारी पक्ष




काँग्रेससोबत येऊन एकजुटीने मदमस्त सत्तांधाला पाय उतार करू शकतील.

भारत जोडो यात्रा महाराष्ट्रात प्रवेश करत असताना राहूल गांधी म्हणाले की, महाराष्ट्राचे दुःख ऐकू. देशातील महागाई, बेरोजगारी, जातीयता इ.प्रश्नांना ऐरणीवर मांडत ही यात्रा यशस्वीरीत्या पुढे जात आहे. महाराष्ट्रातील ओबीसीच्या राजकीय आरक्षणाचा तिढा कायम आहे. ही ओबीसीवरील आघाताची ताजी जखम झाली. भारताची दशवार्षिक जनगणना होत असते. त्यावेळी ओबीसीची जातवार जनगणना व्हायला हवी पण ती होत नाही. त्यामुळे ओबीसी आरक्षण आणि ओबीसी समाजाच्या विकासासाठी अनेक योजना आखताना अडचणी येत असतात. ओबीसी समाजाची व अखिल भारताची जातवार जनगणना करून, मंडल आयोगातील ओबीसी-कल्याणकारी इतर शिफारशी लागू केल्या तर, ओबिसी शेतकरी, बेरोजगार, विद्यार्थी, महिला, कर्मचारी, उद्योजक, व्यावसायिक सर्वांना त्यांचा हक्काचा वाटा मिळू शकेल. काँग्रेसच्यादृष्टीने राहूल गांधींनी ओबीसीबाबत ही भूमिका घेणे खूप आवश्यक वाटते. ओबीसीची खदखद समजून घेणे आवश्यक आहे. शेतकरी-कष्टकरी समाजाच्या समस्यांची यात आणखी भर पडते. गतवर्षी दिल्लीच्या जवळ शेतकऱ्यांनी ज्या जिद्दीनं आंदोलन चालवलं त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन शेतकऱ्यांसाठी आश्वासक भूमिका घ्यावी लागेल. डॉ स्वामिनाथन आयोगाने शेतकऱ्यांसाठी केलेल्या शिफारशी लक्षात घेऊन शेतकरी हिताची बाजू मांडली पाहिजे.राहूल गांधींना भारत जोडो यात्रेदरम्यान जे मान्यवर भेटतात त्यांनी राहूल गांधींच्या कानावर ह्या बाबी टाकल्याशिवाय शेतकरी-ओबीसी लोकांच्या हृदयात उतरता येणार नाही. भारत जोडो यात्रेत जुळणाऱ्या अनेक गैरराजकीय समाजहितैषी बांधवांना या मुद्दयांचे महत्त्व माहीत आहे. त्यांच्याशी राहूल गांधींचा संवाद राजकीय एकसंघ पर्याय उभा करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

भारत जोडो यात्रेला मिळत असलेलं समर्थन राजकारणाच्या पलिकडचे आहे.परधर्म द्वेष, जातीय तेढ, समताविरोधी, बंधुत्ववरोधक असं या देशात सध्या जे वातावरण आहे ते लोकांना नकोसं झालंय. ते बदलून टाकण्यासाठी मुजोर राजवट विरुद्ध सामाजिक जूट अशा स्वरूपात ही लोकयात्रा निर्णायक ठरावी.

सन १९२० पूर्वी टिळक युग संपेपर्यत काँग्रेसची प्रतिमा फार चांगली नव्हती. कांग्रेस ही शेटजी-भटजी-लाटजी यांची बटीक संघटना समजली जात असल्यामुळे बहुजन समाजाचा तिकडे फारसा ओढा नव्हता. पण १९२० मध्ये काँग्रेसचे नेतृत्व बदलले आणि ते महात्मा गांधींकडे आल्यानंतर काँग्रेसचा नूरच पालटला जाऊ लागला. सत्यशोधक चळवळीतून उदित झालेल्या ब्राह्मणेतर पक्षाच्या पुढाऱ्यांनी काँग्रेसच्या नेतृत्वावर विश्वास दाखवायला सुरुवात केली. परिणामतः ब्राह्मणेतर, अर्थात शेतकरी-कष्टकरी-ओबीसी अशा निम्न-मध्यम जातींचा काँग्रेसमध्ये सहभाग वाढू लागल्याने काँग्रेसचे बळकटीकरण होऊ लागले. तत्कालीन परिस्थितीत ब्राह्मणेतरांचे शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय हितकारक सामाजिक न्यायाचे प्रश्न, सावकारी व धार्मिक शोषण, शैक्षणिक प्रश्न सुटतील या आशेने बहुजन समाज काँग्रेसकडे आशाळभूत नजरेने पहात, विषमतावादी सनातनी शक्तींपासून दूर राहत असे.

महात्मा गांधींच्या नेतृत्वात घडलेल्या या बदलाला शंभर वर्ष पूर्ण होत असताना राहुल गांधी यांच्या नेतृत्वातील यात्रेकडे विद्यमान परिस्थितीत बहुजन समाज काँग्रेसकडे मोठ्या आशेने बघत आहे. ऐंशीच्या दशकात मंडल आयोगाच्या लढ्याने जोर पकडला असताना उच्चजातीय दबावाखाली ओबीसी समाजाच्या आंदोलनाकडे काँग्रेसने लक्ष दिले नाही, उलट साठे सारखे आरक्षणविरोधी काँग्रेसवासी मंडल आयोगाला विरोध करत होते, मा.व्ही पी सिंगांनी मंडल शिफारशी लागू केल्या.नंतर मा.प्रधानमंत्री नरसिंहराव यांच्या कारकिदीत त्यालाच सायस्तर- क्रिमीलेयर लावण्यात आले. ओबीसी आरक्षणाला कात्री लागली. ओबीसीची अतोनात हानी झाली. ती अजुनही भरुन निघालेली नाही. ओबीसीची जातवार जनगणना करुन ओबीसी वरील अन्याय दूर करण्याची संधी काँग्रेसने घ्यायला हवी. त्यामुळे ओबीसीचे परत काँग्रेसला बळ मिळेल. ओबीसींनादेखील काँग्रेस कडून हीच माफक अपेक्षा आहे. देशातील आर्थिक परिस्थिती, राजकीय माजोरी, सामाजिक कटुता, धार्मिक तेढ सांस्कृतिक कुरघोडीचे उच्चवर्णीयांचे आडाखे-तडाखे यांचा विचार करता काँग्रेसच्या पाठीशी उभे राहण्याची या देशातील विवेकी विचारवंत, पत्रकार साहित्यिक, फुले-शाहू-आंबेडकर-साम्यवादी-समाजवादी-सेक्युलर राजकीय शक्ती,सामान्य माणसाची भूमिका काँग्रेसने समजून घेतली पाहिजे, तरच राहुल गांधींच्या प्रयत्नांना चार चाँद लागण्याची अपेक्षा करता येईल.


**-अनुज हुलके**
०८/११/२०२२

# २० नोव्हेंबर रोजी जिल्हास्तरीय संविधान गौरव स्पर्धा परीक्षा

## जिल्ह्यातील ८ तालुक्यांतील ४० परीक्षा केंद्रांवर हजारो स्पर्धक घेणार भाग

**गोंदिया:-** संविधान मैत्री संघ व सर्वसमाज मित्र संघटना आणि विविध शाळा महाविद्यालय प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान प्रस्तावना, संविधानात दिलेले मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्ये, महिला सुरक्षा हक्क आणि बाल संरक्षण कायदा इ. प्राथमिक माहिती विषयावर जिल्हास्तरीय "संविधान गौरव स्पर्धा परीक्षा' रविवार दि. २० नोव्हेंबर २०२२ रोजी जिल्ह्यातील ८ तालुक्यांतील ४० परीक्षा केंद्रांवर घेण्यात येत आहेत. ज्यामध्ये ५००० स्पर्धकांचा सहभाग अपेक्षित आहे.

जिल्ह्यात प्रथमच एकाच दिवशी, एकाच वेळी भव्य स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या या संविधान गौरव स्पर्धा परीक्षेच्या समिती प्रमुख प्रमुख जिल्हा समन्वयक, प्रा.डॉ. दिशा गेडाम यांनी या ज्ञानवर्धिनी परीक्षेत जास्तीत जास्त संख्येने विद्यार्थी व महिलांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले व परीक्षेची माहिती देताना सांगितले की, संविधानाला ७२ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त ७२ प्रश्न दिले जाणार असून प्रत्येकी १ गुण प्रमाणे ६० प्रश्न वस्तुनिष्ठ आहेत, १० प्रश्न वर्णनात्मक (प्रत्येकी ३ गुण), २ प्रश्न वर्णनात्मक (प्रत्येकी ५ गुण) वर्णनात्मक प्रश्नांना पर्याय दिले जाणार नाहीत ऐसे १०० गुणाचे प्रश्नपत्र राहणार आहे. भाषा हिंदी आणि मराठी असेल.




प्रत्येक तालुक्यात दोन गट असतील-कनिष्ठ गट- विद्यार्थी (१८ वर्षांपर्यंत) आणि वरिष्ठ गट - महिला / पुरुष (१८ वर्षांपेक्षा जास्त), बक्षीस रक्कम प्रथम २०००/-, द्वितीय १५००/-, तृतीय १०००/ - प्रत्येक तालुक्यासाठी अशा प्रकारे ८ तालुक्यांत एकूण ७२ हजार रुपये रोख व ७२ प्रोत्साहनपर पारितोषिके देण्यात येणार असून सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. बक्षीस वितरण २७ नोव्हेंबर २०२२ रोजी समाज कल्याण अधिकारी कार्यालय, गोंदिया येथे होणार आहे. नोंदणीची अंतिम तारीख १६ नोव्हेंबर २०२२ आहे. अतुल सतदेवे , जे.के. लोखंडे, आदेश गणवीर यांच्याशी संपर्क साधता येईल व स्थानिक नोंदणीसाठी परीक्षा केंद्र व केंद्रप्रमुख तहसील निहाय यांच्याशी संपर्क केला जाऊ शकतो.

# आता स्थलांतरीत बालकांचा शोध

**गोंदिया:** सर्व शिक्षा अभियानांतर्गत स्थलांतरीत बालकांचा शोध घेून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची मोहीम जिल्ह्यात २० नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येणार आहे. याकरिता नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली असून या मोहिमेत ३ ते १८ वर्षे वयोगटातील बालकांचा शोध घेण्यात येणार आहे.



बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील कलम ४ नुसार स्थलांतरीत बालकांचा शोध घेऊन शिक्षण हमी कार्ड देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याद्वारे या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रमुख उद्दीष्ट आहे. तसेच स्थलांतरीत मुलांचे सर्वेक्षण करुन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी अशा बालकांच्या बाबतीत करावयाच्या उपाययोजना व त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे उपेक्षीत आहे. यासाठी विविध कारणांमुळे स्थलांतरीत होणाऱ्या कामगारांच्या बालकांचे शिक्षण अबाधित राखण्यासाठी जिल्ह्यात २० नोव्हेंबरपासून विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. तर ५ डिसेंबर रोजी मोहिमेची एकंदरित माहिती जिल्हा प्रशासनाला देण्यात येणार आहे. सर्वेक्षणाचा कालावधी, मार्गदर्शक सुचना व सामान्य प्रतिबंधक उपाय, सर्वेक्षणाची अंमलबजावणी, कामाचे वेळापत्रक, कार्यवाही करण्याची जवाबदारी, विविध नियंत्रण कक्ष स्थापन करण्याबाबतचे नियोजन आखून देण्यात आले आहे. त्याकरिता नोडल अधिकारी, प्रगणक यांची जवाबदारी देखील संबंधितांवर देण्यात आली आहे.

# न्यायालयीन वाद...बिनखर्चाचा कायदेशीर तोडगा....हा मार्ग लोकन्यायालयाचा...!!

प्रलंबित तसेच दाखलपूर्व वाद प्रकरणे सामंजस्य आणि तडजोडीने मिटविण्यासाठी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणच्या आदेशानुसार जिल्हा जिल्हा व सर्व तालुका न्यायालयांमध्ये १२ नोव्हेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात येत आहे. लोकन्यायालयात कोणत्या प्रकरणांवर तोडगा काढला जातो, लोकन्यायालयाचे स्वरूप, त्याचे फायदे याविषयीची माहिती देणारा विशेष लेख...

गावोगावी वाद मिटविण्याची आपली एक प्राचीन परंपरा होती. वाद उद्भवला तर तो शक्यतोवर सामंजस्याने सोडवला जायचा. गावातील जुनी-जाणती माणसे एकत्र येत आणि कोणामध्ये उद्भवलेला कुठल्याही स्वरुपाचा वाद समजुतीने मिटवित. ज्यांच्यापुढे वाद नेला जाई, ते त्या गावातील आदरणीय आणि निःपक्षपाती लोक असत. यालाच गाव-पंचायत असे म्हणत. सध्याचे लोकन्यायालय म्हणजे या गाव पंचायतीचेच आधुनिक रुप. जेथे कायदा जाणणाऱ्या निःपक्षपाती लोकांचे न्यायमंडळ त्यांच्यापुढे येणाऱ्या प्रकरणामध्ये सामंजस्याने न्याय्य तडजोड घडविण्याचे काम लोकन्यायालयात होते.

**लोक न्यायालयाचे फायदे:** -खटल्यामध्ये साक्षी-पुरावा, उलटतपासणी, दीर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात, निकाल झटपट लागतो. लोकन्यायालयाच्या निवाड्याविरुध्द अपील नाही. एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते. लोकन्यायालयाचा निवाडा हा आपसात समजुतीने होत असल्याने ना कोणाचा जय होतो ना कोणाची हार होते. त्यामुळे निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो. परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकामेकात द्वेष वाढत नाही व कटुताही निर्माण होत नाही. कोर्टाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोकन्यायालयात होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते. वेळ आणि पैसा दोन्हींचीही बचत होते व लोक न्यायालयात निकाली निघणा-या प्रकरणामध्ये कायद्यानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.

**तडजोडीचे स्वरुप नेमके काय?**

भू-संपादन:-भूसंपादन झाल्यावर दिलेली नुकसान भरपाई कमी आहे अशा तक्रारीचे अर्ज सादर करुन अतिरिक्त नुकसान भरपाईची मागणी केली जाते. अलीकडे महाराष्ट्र शासनाने निरनिराळे शासन निर्णय पारीत केले असून, त्यानुसार भरघोस वाढीव नुकसान भरपाईची तरतूद केली आहे. त्या आधारे दोघांच्या सहमतीने नुकसान भरपाई लोकअदालती दरम्यान पक्षकारांना मिळत आहे. सदर निकालावर अपील नसल्याने शासन किंवा भू-संपादन प्राधिकरण लवकरच नुकसान भरपाई रक्कम न्यायालयात जमा करतात.

**मोटार अपघात दावे:-** छोट्या जखमा, मृत्यू अशा काही संवर्गातील दाव्यांसाठी नामदार सर्वोच्च न्यायालय यांनी नुकसान भरपाई मिळणेसाठी काही निकष निश्चित केले आहेत. प्रकरणात साक्षी पुरावे होवुन त्याच निकषाचे आधारे नुकसान भरपाई मंजूर होते. अशी प्रकरणे लोकअदालतीत सामोपचाराने मिटू शकतात. अर्जदारांना तात्काळ त्याची रक्कम विमा कंपनी आदा करतात. याउलट साक्षी पुरावे होवुन निकाल लागल्यास त्याला कालावधीही जातो आणि अपीलाचीही शक्यता असते. अनुषंगाने अर्जदारास काही वेळा उच्च न्यायालयापर्यंत जावे लागते व रक्कम प्रत्यक्ष मिळण्यात देखील विलंब होवू शकतो.

**धनादेश न वठलेली प्रकरणे:** - जास्त प्रकरणे ही पतसंस्था किंवा वित्तीय संस्थाकडून घेतलेल्या कर्जाचे परतफेडीपोटी दिलेल्या धनादेशांबाबत असतात. प्रकरण न्यायालयात चालल्यास एकतर आरोपीस शिक्षा होते किंवा प्रकरण खारीज होवून आरोपी मुक्त होतो. अशा बाबतीत अपीलाची शक्यता असतेच. एकंदर वित्तीय संस्थाची कायदेशीर वसुली देखील लवकर होत नाही आणि आरोपीची देखील कायम स्वरुपी मुक्तता होते. लोकअदालतीत अशा प्रकरणात चर्चा होवुन ती काढली जातात. आरोपीला देय रक्कम मान्य असेल तर काही रक्कम लोकअदालती दिवशी न्यायालयात भरुन उर्वरीत रकमेसाठी कालावधी ठरवुन हुकूमनामा केला जातो. यामुळे फिर्यादीची देखील वसुली होते आणि आरोपीची न्यायालय, पोलीस, वॉरंट, अपील या चक्रव्यूहातून कायमची मुक्तता होते. हुकूमनाक्यानुसार आरोपीने वर्तणूक केली नाही तर न्यायालयामार्फत त्याची अंमलबजावणी केली जाते. अनुषंगाने फिर्यादी संस्थेस रक्कम वसुलीची कायदेशीर हमी मिळते. न्यायालयीन शुल्क परत मिळत असल्याने आरोपीस त्याचा फायदा होतो.

**वैवाहिक प्रकरणे:-** बरेचसे वैवाहिक वाद हे संवादाच्या अभावामुळे निर्माण झालेले असतात. एका वैवाहिक वादामुळे निरनिराळी चार-पाच प्रकरणांचा जन्म होतो. लोकअदालती दरम्यान उभयंतामध्ये तंत्रशुध्द आणि तज्ञांमार्फत संवाद घडवून आणला जातो. त्यामुळे त्यांच्या कृत्याचे परीणाम लक्षात येतात, गैरसमज दूर होतात. आपल्याकडे आता कौटुंबिक न्यायालय स्थापन झाले आहे. त्यामध्ये तज्ञ समुपदेशक आहेत, त्यांची मदत घेता येते. पक्षकार अशा चर्चेत अनौपचारीक आणि विना दडपण मन मोकळेपणे बोलू शकतात. एकंदर योग्य पध्दतीने सौदार्हपूर्ण तंत्र वापरुन वैवाहिक प्रकरणे सामोपचाराने निकाली निघू शकतात.

**दिवाणी दावे:-** याचे उत्तम उदाहरण म्हणजे वाटपाचे दावे. कायद्याने नातेसंबंध आणि त्यावर आधारुन हिस्से या बाबी स्पष्ट केलेल्या आहेत. प्रकरणात साक्षी पुरावे होवुन कायद्याच्या चौकटीबाहेर निकाल लागत नाही. अशा वेळी समोरा समोर चर्चा झाल्यास सौदार्हपूर्ण मार्ग निघू शकतो. महत्वाचे म्हणजे साक्षी पुरावे होवून निकाल झाल्यास अपीलाची शक्यता असल्याने, प्रत्यक्ष सरस-निरस मानाने वाटप होण्यास बराच कालावधी लागतो. काही वेळा तर पिढ्यान पिढ्या अशी प्रकरणे सुरु असल्याचे आपण पाहतो. याउलट लोकन्यायालयात तात्काळ प्रत्यक्ष वाटप होवू शकते. अपील नसल्याने कौटुंबिक कलह कायमस्वरुपी संपुष्टत येवून नातेसंबंध बळकट होतात. इतर दिवाणी दाव्यात देखील कायदयाचे आधारे प्रत्यक्ष चर्चा करुन कायम स्वरुपी वाद मिटू शकतो.

**तडजोडपात्र फौजदारी खटले:-** बरीचशी प्रकरणे अशी असतात की, आरोपीला शिक्षा व्हावी अशी फिर्यादीची सुप्त इच्छा नसते. केवळ अहंकारापोटी किंवा गैरसमजातून असे वाद निर्माण होतात. अशा प्रकरणात वैविध्यपूर्ण मार्ग पडताळून तडजोड होवू शकते. फिर्यादीत नुकसान भरपाई देखील मिळू शकते, आरोपी तुरुंगवासाच्या शिक्षेतून सुटका करुन घेवून शकतो.

**बँकेची थकीत कर्ज प्रकरणे:** - कर्ज घेतले आहे हे जर मान्य असेल तर ९० टक्के प्रकरणामध्ये कर्जदार हे मुदत मागतात किंवा व्याजाच्या बाबतीत तक्रार असते. या बाबी लोकअदालतीत नक्कीच विचारात घेतल्या जातात. बँक देखील लवचिक धोरण स्विकारुन अनेक योजनांचा लाभ लोकअदालती दरम्यान देवू शकतात. कर्जदारास काही वेळा हप्त्याची मुभा देखील मिळते. न्यायालयीन शुल्क परत मिळत असल्याने अप्रत्यक्षपणे कर्जदाराचाच फायदा होतो. हा निकाल बँक आणि कर्जदार या दोघांनाही सुकर असतो. त्यामुळे कर्जदारांनी लोकअदालतीत भाग घेवून चर्चेला यावे.

**दाखलपूर्व प्रकरणे:-** या प्रकरणामध्ये कोर्टात दाखल होण्यापूर्वी चर्चा होवून प्रकरण निकाली निघते व कोर्टात निकाल होवुन जसा न्याय मिळतो तसाच हुकूमनामा मिळत असल्याने दोन्ही पक्षकारांचा फायदा होतो. तसेच पुढील कोर्ट कामकाजास तोंड द्यावे लागत नाही. त्यामुळे वेळ व पैसा वाचतो. एकंदर लोकन्यायालय हा कायदेशीर आणि समर्पक मार्ग असून, वादाचे कायमस्वरुपी निराकरण होवू शकते. पक्षकारांनी लोकअदालतीत प्रकरण ठेवण्याकरीता आपले विधिज्ञांना किंवा न्यायालयास विनंती करावी.

**जिल्हा माहिती कार्यालय, गोंदिया**

# बाघ पाटबंधारे कार्यालय परिसरातील सागवन वृक्षांची कत्तल

**सालेकसा:-** तालुक्यातील साखरीटोला नजिकच्या मक्काटोला येथे असलेल्या पाटबंधारे विभागाच्या शाखा कार्यालय परिसरातील सागवन वृक्षांची अवैधरित्या कत्तल करण्यात आली. एवढेच नव्हे तर सागवन लाकडांची परस्पर विल्हेवाट लावण्यात आल्याचे उघडपणे दिसून येत आहे. कुंपणच खात आहे शेत या म्हणीप्रमाणे पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्याकडूनच हे कृत्य करण्यात आल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, या संदर्भात संबधित शाखा अभियंता प्रियम शुभम यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी वादळामुळे झाडे पडल्याने कापण्यात आली, असे सांगितले आहे. या प्रकाराकडे वनविभागाचेही सोयीस्कर दुर्लक्ष आहे. त्यामुळे वनविभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण होवू लागले आहे.




साखरीटोला वनक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या मक्काटोला येथे बाघ पाटबंधारे विभागाचे शाखा कार्यालय आहे. या ठिकाणी शाखा अभियंता निवासस्थानही आहे. पाटबंधारे विभागाच्या कार्यालय परिसर तसेच निवासस्थानाच्या मागील भागात मोठ्या प्रमाणात सागवनाची झाडे होती. मात्र गेल्या काही दिवसातच कार्यालय परिसरातील झाडांची अवैधरित्या कत्तल करून लाकडांची परस्पर विल्हेवाट लावल्याचे पहावयास मिळत आहे. एंकदरीत सागवनाची तस्करी झाल्याचे उघडपणे दिसून येत आहे. मात्र या सर्व प्रकारापासून बाघ पाटबंधारे तसेच वनविभागाचे अधिकारी अनभिज्ञ कसे? असा सवाल उपस्थित होत आहे. कार्यालय परिसरात कापलेल्या झाडांचे प्रत्यक्ष पुरावे पहावयास मिळत आहेत. वनविभाग तथा बाघ पाटबंधारे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या बाबीची तसदी घेवून चौकशी करावी तसेच या प्रकरणात सहभागी असलेल्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी, अशी मागणी परिसरात जोर धरू लागली आहे.

**कार्यालय परिसरातील झाडाची कत्तल आणि लाकडांची विल्हेवाट या दोन्ही प्रकाराची आपणास कसलीही माहिती नाही. तरीही या प्रकरणाची माहिती घेवून चौकशी करू तसे वरिष्ठ कार्यालयाला कळविण्यात येईल.**

**- एम.पि.कठाणे, सहाय्यक कार्यकारी अभियंता आमगाव**

**संबंधित प्रकरणाची माहिती घेवून त्या संदर्भात चौकशी करण्यात येईल. चौकशीत तथ्य आढळल्यास तसेच या प्रकरणात जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर योग्य कारवाई करणार.**

**- राजीव कुरेकार, कार्यकारी अभियंता गोंदिया**

**नियमानुसार परवानगी घेतल्याशिवाय झाडे कापता येत नाही. मात्र बाघ पाटबंधारे विभाग कार्यालय परिसरातील झाडाची अवैधरित्या कत्तल करण्यात आली. अशी तक्रार प्राप्त असून त्याची दखल घेण्यात आली आहे. चौकशी करीता कर्मचाऱ्यांना कामाला लावण्यात आले आहे. या प्रकरणातील दोषींवर वनअधिनियमातंर्गत कारवाई करण्यात येईल.**

**- जी.एस.राठोड, वनपरिक्षेत्राधिकारी सालेकसा**

# जि.प.उपाध्यक्षांचा अनाथांना मदतीचा आधार

**अर्जुनी मोरगावः** जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा सभापती शिक्षण क्रीडा व आरोग्य इंजि.यशवंत गणविर हे तालुक्याच्या दौऱ्यावर असताना वडेगाव स्टेशन येथील सुनिल बुराडे यांच्या माध्यमातून गावात तीन अनाथ भावंडे असल्याची माहिती मिळाली.त्या माहितीच्या आधारे जि.प.उपाध्यक्ष इंजि.गणविर यांनी त्या तीन अनाथ भावंडांचे घर गाठले. पोहचल्यानंतर मन सुन्न करणारे ते दृश्य, अवघे दहा वर्षे वय असलेली मोठी बहिण मुस्कान आपल्या भावंडांना साभाळत संसाराशी भांडत आहे. धाकटी बहिण प्रिया वय ८ व भाऊ अर्जुन वय ६,यांना आपल्या म्हातारी आजीच्या मदतीने त्यांना सांभाळत आहे.



पाच वर्षांपूर्वी वडील वारले व चार वर्षांपूर्वी आई आपल्या पोटच्या गोळ्यांना सोडुन गेली. ती तीनही मुले पोरकी झाली. उपाध्यक्षानी त्या मुलांशी हितगुज साधले. त्यांची विचारपुस केली. रेशन दुकानातील मिळणाऱ्या धान्यावर आपली पोटाची खळगी भरतात.

खेळण्याच्या वयात ती मुलं संसार मांडुन जीवन जगत आहेत हे पाहून अश्रु त्या भावंडांना ३००० हजाराची तात्पुरती आर्थिक मदत केली. व शेजारच्यांना या मुलांना कोणत्याही गोष्टीची कमतरता भासली तर मला लगेच कळवा मी इथे येऊन या मुलांची समस्या सोडविन व शासनाच्या वतीने यांना मदत मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करून लवकरात लवकर मदत मिळवून देण्याची ग्वाही दिली.

# राष्ट्रीय लोक अदालत मध्ये ५२१४ प्रकरण निकाली

**गोंदिया :** राष्ट्रीय लोक अदालत मध्ये एकूण ठेवलेल्या प्रकरणांपैकी ५ हजार २१४ प्रकरणे निकाली काढण्यात आली. यावेळी एकूण रुपये ३ कोटी ७९ लाख १९ हजार ३२८ (तीन कोटी एकोनअंशी लाख एकोणविस हजार तीनशे अठ्ठावीस रुपये) एवढी वसुली करण्यात आली. यामध्ये जिल्ह्यातील न्यायालयात ठेवलेल्या प्रकरणांपैकी १ हजार ४४० प्रकरणे निकाली काढण्यात आली व रुपये २ कोटी ८० लाख ०३ हजार ४५८ वसुली करण्यात आली. तसेच लोकअदालतमध्ये ठेवण्यात आलेले पूर्व न्याय प्रविष्ठ ११ हजार ८५६ प्रकरणांपैकी ३ हजार ७७४ प्रकरणे निकाली काढण्यात आली व यामध्ये रुपये ९९ लाख १५ हजार ८७० ची वसुली झाली.

वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित असलेले खटले समोपचाराने व सामंजस्याने तात्काळ निकाली काढण्याकरिता राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांचे निर्देशानुसार अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गोंदिया ए. टी. वानखेडे तसेच सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण एस. व्ही. पिंपळे यांचे मार्गदर्शनाखाली १२ नोव्हेंबर २०२२ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय गोंदिया येथे तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका विधी सेवा समित्यांमार्फत तालुका न्यायालयांमध्ये सर्वच प्रकारच्या तडजोड पात्र न्यायप्रविष्ठ व पूर्व न्याय प्रविष्ठ प्रकरणाकरिता तसेच विद्युत व बँक लोकोपयोगी पूर्व न्यायप्रविष्ठ प्रकरणांकरीता राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

लोक अदालतीच्या फलकाचे उद्घाटन ए. टी. वानखेडे अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गोंदिया यांच्या शूभहस्ते करण्यात आले. ॲड. बडे, ॲड. सचिन बोरकर सर्व न्यायाधीश वर्ग यावेळी उपस्थित होते.




एकूण ठेवलेल्या प्रकरणांपैकी ५ हजार २१४ प्रकरणे निकाली काढण्यात आली व एकूण रुपये ३ कोटी ७९ लाख १९ हजार ३२८ (तीन कोटी एकोनअंशी लाख एकोणविस हजार तीनशे अठ्ठावीस रुपये) एवढी वसुली करण्यात आली. यामध्ये जिल्ह्यातील न्यायालयात ठेवलेल्या प्रकरणांपैकी १ हजार ४४० प्रकरणे निकाली काढण्यात आली व रुपये २ कोटी ८० लाख ०३ हजार ४५८ वसुली करण्यात आली. तसेच लोकअदालतमध्ये ठेवण्यात आलेले पूर्व न्याय प्रविष्ठ ११ हजार ८५६ प्रकरणांपैकी ३ हजार ७७४ प्रकरणे निकाली काढण्यात आली व यामध्ये रुपये ९९ लाख १५ हजार ८७० ची वसुली झाली. यामुळे पक्षकार व इतरांना होणारा मानसिक व आर्थिक त्रासामधून सुटका मिळाली. यामुळे बऱ्याच पक्षकारांनी समाधान व्यक्त केले आहे.

प्रकरणी तडजोडीने निकाली काढण्याकरिता गोंदिया येथे आदिल खान, जिल्हा न्यायाधीश -१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, गोंदिया, एन. डी. खोसे, तदर्थ न्यायाधीश-१, गोंदिया, आर. एस. कानडे, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, गोंदिया, ए. व्हि. कुलकर्णी, मुख्य न्यायदंडाधिकारी, गोंदिया, व्हि.ए. अवघडे, सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, गोंदिया, कु. पी. एन. ढाणे, २ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, गोंदिया, एम.बी.कुडते, ३ रे सहदिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, गोंदिया, वाय.जी.तांबोळी ४ थे सह दिवानी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, गोंदिया, एस.डी.वाघमारे, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, गोंदिया यांनी व गोंदिया जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष सी.के.बडे, वकील, एस. आर. बोरकर व इतर पदाधिकारी तसेच पॅनल वरील वकील ॲड. एस. एम. विश्वास, ॲड. ई. एस. गणवीर, ॲड. कु. एस.डी.मेश्राम, ॲड.कु.एन.डी. अग्रवाल, ॲड. एम.ए.नेवारे, ॲड. कु.पी.सी. चौरसिया, ॲड. कु. एम.एस. भोवते गोंदिया यांनी सहकार्य केले.

सदर लोक अदालतीचे यशस्वी आयोजनाकरिता आर.जी. बोरीकर, प्रबंधक, पी.पी.पांडे, अधीक्षक, एम. पी. पटले सहा. अधीक्षक, जिल्हा न्यायालय गोंदिया जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथील आर.जे.ठाकरे. अधीक्षक, सचिन एम. कठाणे, पी. एन. गजभिये, सुशिल डी.गेडाम, तसेच बी.डब्ल्यू.पारधी, यु.पी. शहारे, बेलीफ, जगदीश पटले, पी.एल.व्ही गोंदिया तसेच इतर सर्व न्यायालयीन कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# महिला लोकशाही दिन २१ नोव्हेंबरला

**गोंदिया :** महिला व बाल विकास विभागाच्या वतीने जिल्हा स्तरावर दर महिन्याचा तिसरा सोमवार ङ्गमहिला लोकशाही दिनङ्ग म्हणून साजरा करण्यात येतो. महिलांच्या कोणत्याही विभागाशी संबंधीत समस्या, वैयक्तीक समस्या, गा-हाणी, अडीअडचणी याबाबत महिला लोकशाही दिनात त्यांचे निवेदन स्विकारण्यात येतात अशी माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तुषार पौणिकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

सोमवार २१ नोव्हेंबर २०२२ रोजी जिल्हा स्तरावर महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

सर्व महिला कर्मचारी व महिला मंडळ, बचत गट इतर महिलांसाठी काम करण्या-या संस्था येथील महिला थेट सभेमध्ये येऊन वैयक्तीक तक्रार नोंदवू शकतात. तालुका स्तरावरील अर्ज तालूका स्तरावर चौथ्या सोमवारी सादर करावेत. अर्जाचा नमुना बाल विकास अधिकारी यांचेकडे निःशुल्क प्राप्त होईल. तसेच जिल्हा स्तरीय महिला लोकशाही दिनाकरीता अर्जाचा नमूना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नविन प्रसासकिय इमारात, तिसरा माळा रुम न.३६ जयस्तंभ चौक गोंदिया या कार्यालयात निःशुल्क प्राप्त होईल.

जिल्हा स्तरावर महिला लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या तिसरा सोमवार आयोजित करण्यात येतो. जिल्हाधिकारी, गोदिंया यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी यांचे सभागृहात २१ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ११ वाजता सोमवार ला जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन आयोजित केलेला आहे. तरी सर्व महिला मंडळ, बचत गट इतर महिलांसाठी काम करण्या-या संस्था तसेच पिडीत महिलांनी आपले अर्ज कार्यालयात सादर करावे. सर्व महिलांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमून्यात नसणारे व आवश्यक कागदपत्राच्या प्रती न जोडलेल्या अर्ज, सेवा विषयक , आस्थापना विषयक बाबी, तक्रार व निवेदने वैयक्तीक स्वरुपाचे नसेल तर ते अर्ज स्विकार करण्यात येणार नाहीत. सर्व पिडीत महिलांनी सदर कार्यालयात व्यक्तीसः येऊन तक्रार तीन प्रतीत सादर करावी.

## मॉडेल कॉन्व्हेंट एण्ड सायन्स ज्यू. कॉलेज गोरेगांव मध्ये बालदिवस उत्साहात



**गोरेगाव:-** स्थानीय मॉडेल कॉन्व्हेंट एण्ड सान्स ज्यू. कॉलेज गोरेगांव मध्ये १४ नोव्हेंबरला स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालदिवस म्हणुन उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला शाळेचे संस्थापक प्रा. आर. डी. कटरे हे अध्यक्ष, तसेच शाळेचे प्रशासकीय अधिकारी सी. बी. पटले, शाळेच्या प्राचार्या सौ. सी. पी. मेश्राम, तसेच स. शि. आर. एम. कटरे हे प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात पंडित जवाहरलाल नेहरूयांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी भाषणे आणि गीत सादर केले. तसेच कार्यक्रमाला उपस्थित प्रा. आर. डी. कटरे यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे सी. बी. पटले सर यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सर्व विद्यार्थी व शिक्षकवृंद यांनी सहकार्य केले. कार्यक्रमात दिवाळी सुट्टीमधे विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या दिवाळी हॉलिडे पुस्तकाचे गुणदान करून उत्कृष्ठ लिखाण केलेल्या विद्यार्थ्यांना शाळेकडून बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन वर्ग ८ वी ची विद्यार्थिनी कु. निधी राहुल कटरे, कु. अलिशा परमानंद रहांगडाले तर आभार कु. सोनाली सुरेश राऊत हिने मानले.

## धान खरेदीसाठी ऑनलाईन नोंदी पूर्ण करा- एम.व्ही.बाजपेयी

**गोंदिया :** शासकीय आधारभूत धान खरेदी योजनेअंतर्गत पणन हंगाम २०२२-२३ मधील धान खरेदी करिता एन ई एम एल पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करिता ३० नोव्हेंबर २०२२ पर्यत मुदत वाढ देण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व धान उत्पादन शेतकऱ्यांनी तालुक्यातील नजीकच्या आधारभूत धान खरेदी केंद्रावर स्वतःचे प्रत्यक्ष लाईव्ह फोटो अपलोड करून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी एम. व्ही. बाजपेयी यांनी केली आहे.

चालु हंगामाचे ७/१२ उतारा, आधारकार्ड, बँक पासबुक व मोबाईल नंबर इत्यादी कागदपत्रे सादर करून ३० नोव्हेंबर २०२२ पर्यत खरीप हंगामातील धान खरेदी करिता ऑनलाईन नोंदी पूर्ण करून घ्यावी व शासनाच्या धान खरेदी योजनेचा लाभ घ्यावा. तसेच कोणत्याही शेतकऱ्यांनी जनधन योजनेचे खाते, संयुक्त बँक खाते नोंदणी करताना देवु नये असे आवाहनही त्यांनी केले.

## रेल्वेमध्ये धुमाकुळ घालणाऱ्या चोरास मोबाईल व इतर साहित्यासह अटक

**गोंदिया:-** नंगपुरा मुरी ग्रामपंचायत कार्यालय परिसरात संशयास्पदरित्या वावरणाऱ्या इसमाला १३ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे प्रकटीकरण पथकाने पकडले. पोलिसांनी त्याच्याकडून ४६,६०० रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला. नंगपुरा मुरी येथे रात्रीच्या सुमारास गस्तीवर असलेल्या पोलिस पथकाला मोहित जितेंद्र मेश्राम (२९) हा ग्रामपंचायत कार्यालयासमोर संशयितरित्या फिरताना आढळला.पोलिसांनी त्याची झडती घेतली असता एका बॅगमध्ये धातुची पिवळ्या रंगाची मूर्ती व सात मोबाईल संच असा एकूण ४६,६०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतले.दरम्यान त्याने तीन मोबाईल, धातुची पिवळ्या रंगाची मुती व राखडी रंगाची लेडीज बॅग ही नागपुर- गोंदिया रेल्वेगाडीमध्ये चोरी केल्याची कबुली दिली.



सदरची कारवाई पोलीस अधिक्षक निखील पिंगळे, यांचे निर्देशांन्वये, अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर यांचे आदेशान्वये उपविभागीय पोलीस अधिकारी विजय भिसे व गोंदिया शहर पो.स्टे.चे पोलीस निरिक्षक चंद्रकांत सुर्यवंशी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि सागर पाटील, यांचे नेतृत्वात पोहवा. जागेश्वर उईके ब.न. १९२०, पोहवा. सुदेश टेंभरे ब. न. ५९६, पोहवा . प्रमोद चव्हाण ब.न. ४४८, पोहवा. बिसेन ब.न. १४०२, पोशि. कुणाल बारेवार ब.न. २२४३, पोशि. मुकेश रावते ब.न. ११३५, पोशि. पुरूषोत्तम देशमुख ब.न. १८५४, पोशि. दिनेश बिसेन ब.न. १२९३ यांनी केलेली आहे.

## आमगाव तहसील कार्यालयात २१ ला लोकशाही दिन

**गोंदिया:** प्रत्येक तालुक्यात महिन्याचा तिसऱ्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. २१ नोव्हेंबर रोजी महिन्याच्या तिसऱ्या सोमवारला सकाळी ११ वाजता आमगाव येथे लोकशाही दिनाचे आयोजन तहसिल कार्यालयातील तहसिलदार यांच्या सभागृहात आयोजित करण्यात आले आहे.


# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)**

**कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया**

**अधिक्षक अभियंता, भंडारा सिंचन मंडळ, भंडारा**

**ई-निविदा सुचना क्र.५ सन २०२२-२३ (तिसरी वेळ)**

कार्यकारी अभियंता, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग, गोंदिया खालील कामाकरिता सक्षम असलेल्या कंत्राटदारा कडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा, प्रणाली (ऑनलाईन) निविदा मागवत आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या http:mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावे. तसेच स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची एकुण अंदाजित किंमत (लक्ष) | इसारा/ बयाना रक्कम (लक्ष) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचे वर्ग | पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Excavation of hard Rock of Approach Channel of Pandharwani LIS | 1090789/- | 11000/- | 9 महिने | रू. 2000/-+ जिएसटी 360/- एकुण 2360 | सुशिक्षीत बेरोजगार अभियंता, गोंदिया जिल्ह्यासाठी राखीव | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पंजीकृत नोंदणी वर्ग सात व वरचा |

अ) ई-निविदा उपलब्ध कालावधी:- दिनांक (As Per Online Key Date)
आ) निविदा सादरीकरण कालवधी:- दिनांक (As Per Online Key Date)
इ) निविदा उघडणे :- दिनांक (As Per Online Key Date)
टिप:-अ.क्र.१ ची निविदा सुशिक्षीत बेरोजगार अभियंता, गोंदिया जिल्हा करिता राखीव आहेत.
(सदर निविदे सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल.)
१) कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई-निविदा कोरी प्रपत्रे विकली जाणार नाहीत.
२) सविस्तर ई-निविदा सुचना महाराष्ट्र शासनाचे इलेक्टोनिक टेन्डर management http://mahatenders.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीस बोर्डावर पहावयास मिळेल.
३) या कामाचे अंदाजपत्रक क, दर विश्लेशन, मोजमापे, नकाशे इत्यादी कार्यकारी अभियंता कार्यालयात उपलब्ध आहेत.

**रा.गो.कुरेकर**
कार्यकारी अभियंता
बाघ इटियाडोह पाटबंधारे विभाग
गोंदिया

सहपत्र:-


# गोंदिया जिल्ह्यात ३४८ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा वाजला बिगुल

**गोंदिया :** जिल्ह्यात ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. जिल्ह्यातील ३४८ ग्रामपंचायतींवर जनतेतून थेट सरपंचाची निवड केली जाणार आहे. १८ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे गुलाबी थंडीत जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापणार आहे. सरपंच उमेदवारांसह सदस्य पदांसाठी उमेदवारांची निवड पूर्ण करून प्रचार मोहिमेसाठी रणनीती आखली जात आहे.

ग्रामपंचायतमध्ये प्रशासक राज येणार व त्यामुळे ग्रामपंचायत निवडणूक लांबणीवर जाणार, या आशेने अनेक गावात उमेदवारांची निवड करण्यास पुढाऱ्यांनी दुर्लक्ष केले होते. मात्र आता सर्वांनी उमेदवारांच्या निवडीवर फोकस केले आहे. उमेदवारीसाठी गुडघ्याला बाशिंग बांधून सज्ज असलेले निवडणूक लढण्यास इच्छुक उमेदवार लोकांच्या व पुढाऱ्यांच्या भेटी घेत आहेत. त्यातच पुढाऱ्यांनी सदस्य पदांसाठी उमेदवारांची यादी बनविणे सुरू केले असून येत्या चार-पाच दिवसांत त्याला अंतिम रूप देवून प्रचार सुरूकरण्यात येणार आहे.

**निवणुकीत तालुकानिहाय ग्रामपंचायतींची संख्या**

गोंदिया जिल्ह्यातील ३४८ ग्रामपंचायतींपैकी गोंदिया तालुक्यातील ७१, तिरोडा तालुक्यातील ७४, आमगाव तालुक्यातील ३४, अर्जुनी-मोरगाव तालुक्यातील ४०, देवरी तालुक्यातील २५, गोरेगाव तालुक्यातील ३०, सडक-अर्जुनी तालुक्यातील ४३, सालेकसा तालुक्यातील ३१ ग्रामपंचायतींची निवडणूक होणार आहे. यासाठी जिल्हा प्रशासन कामाला लागले असून, पुढील महिनाभर ग्रामीण भागातील वातावरण ढवळून निघणार आहे.




**२८ नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज**

निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार १८ नोव्हेंबर रोजी तहसीलदार निवडणुकीची नोटिस प्रसिद्ध करतील. २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबरपर्यंत नामनिर्देशन मागविण्यात येईल. ५ डिसेंबर रोजी अर्जाची छानणी होईल. ७ डिसेंबर रोजी नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची वेळ व निवडणूक चिन्हाचे वाटप करण्यात येईल. १८ डिसेंबर रोजी मतदान व २० डिसेंबर रोजी निकाल जाहीर करण्यात येईल.

**३४८ ग्रामपंचायतींवर होणार थेट सरपंचाची निवड**

शासनाने सरपंचाची निवड ही थेट जनतेतून करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जिल्ह्यात होणाऱ्या ३४८ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीत ३४८ सरपंचांची थेट जनतेतून निवड केली जाणार आहे. त्यामुळे निवडणुकीमध्ये चुरस वाढली आहे.

**राजकीय पक्ष लागले कामाला**

स्थानिक राजकारणावर पकड मजबूत करण्यासाठी ग्रामपंचायत निवडणूक हाच प्रमुख मार्ग आहे. त्यामुळे ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर सर्वच राजकीय पक्ष कंबर कसून सज्ज व सतर्क झाले असून सभा व बैठकीचे नियोजन केले आहे.

**भूमिपूजन व राजकीय कार्यक्रमांना ब्रेक**

निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेल्या तारखेपासून जिल्ह्यात आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे राजकीय पक्षांच्या सभा, बैठका, भूमिपूजन आणि लोकार्पण कार्यक्रमांना ब्रेक लागला आहे.

**मंडई उत्सवातून संपर्क**

जिल्ह्यातील ग्रामीण भागात दिवाळीनंतर मंडई उत्सवाला सुरुवात होते. सध्या मंडई उत्सव जोरात सुरू असून याच दरम्यान ग्रामपंचायत निवडणुका जाहीर झाल्याने मंडई उत्सवाच्या माध्यमातून भावी उमेदवार जनसंपर्क वाढवित असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे.

**भाऊ रामरामला झाली सुरुवात**

ग्रामपंचायत निवडणुकांमुळे ग्रामीण भागातील राजकीय वातावरण तापले आहे. भावी उमेदवारांनी मोर्चेबांधणीला सुरुवात झाली आहे. याच पार्श्वभूमीवर भावी उमेदवारांनी भाऊ रामराम म्हणण्यास सुरुवात झाली आहे. कधी रामराम न घेणारे आता आर्वजून रामराम घेत आहेत.

**भावी उमेदवार ॲक्टिव्ह मोडवर**

ग्रामपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर भावी उमेदवारांनी सर्वप्रथम मतदार याद्या गोळा करुन आपल्या वॉर्डात किती मतदार आहेत. यापैकी किती जणांचे मतदान आपल्याला मिळू शकते याचा अंदाज घेत सरपंच की सदस्य पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करायचा याची तयारी करण्यास सुरुवात केल्याचे चित्र आहे. गुरुवारी तहसील कार्यालयात ग्रामपंचायत क्षेत्रातील मतदारांच्या याद्या घेण्यासाठी भावी उमेदवारांची गर्दी दिसून आली.


## जाहिर सुचना

श्रीमती अंजिराबाई बे.रामदास ओंमकारी इनके नाम से नगर परिषद रिकार्ड में नाम दर्ज है. जिसका वार्ड क्रमांक १० वार्ड का नाम शास्त्री वार्ड क्र.१० मालमत्ता क्रमांक १०/१२८४ है. उक्त मालमत्ता धारक का निधन दिनांक: - २७/६/२०२० को हो चुका है. इनके निधन उपरांत इनके वारस १) सौ.आरती जौ.सतीश ओंमकारी इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतू आवेदन सादर किया है. हस्तांतरण पर आक्षेप हो तो यह सुचना प्रकाशित होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय में प्रमाणित दस्तावेज सहित सादर करेंगे. आक्षेप प्राप्त न होने पर हस्तांतरण की कार्यवही की जायेगी.

**मुख्य अधिकारी**
**नगर परिषद, गोंदिया**

# अधिकाऱ्यामुळे जि.प.च्या मालमत्तेला वाळवी

**गोंदिया–** राज्यातील जिल्हा परिषदांना आपले महसुली उत्पन्न वाढविता यावे, यासाठी राज्य शासनाने व्यापारी संकुलांचे धोरण स्वीकारले. या संकुलासाठी जिल्हा परिषदांच्या मालकीच्या जागांचे शोध घेण्याविषयी निर्देशही संबंधितांना देण्यात आले. यासाठी पंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला मालमत्ता अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले. गोंदिया जिल्हा परिषदेतील मालमत्ता अधिकाऱ्याने मात्र शासनाच्या या निर्देशाला चक्क ठेंगा दाखविला आहे. या मालमत्ता अधिकाऱ्याच्या कामचुकार पद्धतीमुळे जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागा नेते आणि अतिक्रमणधारकांच्या घशात घालण्याचा उद्योग जोमात सुरू असल्याचे चित्र आहे. स्वतःच्या हुशारीचा स्तोम माजविणाऱ्या कर्तव्यशून्य अधिकाऱ्यामुळे जिपच्या मालकीची मालमत्ता हळूहळू अतिक्रमणाची वाळवी फस्त करीत आहे. याकडे जिल्हा परिषद वा राज्यशासन लक्ष देईल काय? असा प्रश्न ग्रामीण भागातील नागरिकांनी केला आहे.

जिल्हा परिषदेला ग्रामीण भागात विकास करण्यासाठी विकास निधीची नेहमीच चणचण भासत असते. नेहमी राज्य शासनाच्या मदतीवर अवलंबून असणाऱ्या जिल्हा परिषदांना आपल्या उत्पन्नात भर टाकता यावी, यासाठी व्यापारी संकुल तयार करण्याची संकल्पना राज्य शासनाने समोर केली. यासाठी जिल्हा परिषदेच्या मालकीच्या मोकळ्या जागांचे शोध घेण्याचे फर्मान शासनाने सोडले. यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेतील पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मालमत्ता अधिकारी म्हणून अधिकार बहाल करण्यात आले. परंतु, शासनाच्या या निर्णयाकडे गोंदिया जिल्हा परिषदेच्या मालमत्ता अधिकाऱ्याने अद्यापही लक्ष न दिल्याने जिल्हा परिषदेच्या ज्या काही मालकीच्या जागा आहेत, त्या अतिक्रमणकर्त्यांनी गिळंकृत केल्या. यातही पंचायत विभागाकडे अद्यापही जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागा किती? याची साधी माहितीदेखील उपलब्ध नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. जिल्ह्यातील एकाही गटविकास अधिकाऱ्याने तशी माहिती पुरवलेली नसल्याचे सांगण्यात येते. यामुळे तिरोडा नगरपरिषदेतील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगराध्यक्ष व उपाध्यक्षांनी तसेच मुख्याधिकाऱ्यांनी माजी आमदारांच्या मार्गदर्शनात जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण केले. नव्हे तर ती जागा खरेदी केल्याचे दाखवून आपल्या ताब्यात घेतली. यानंतर हे प्रकरण समोर आले. या प्रकरणाची विभागीय आयुक्तांकडे तक्रार करण्यात आली होती. विभागीय आयुक्तांसमोर झालेल्या चौकशीत जिल्हा परिषदेचे वकील आपली बाजू भक्कमपणे मांडण्यात अपयशी ठरले. याउलट तिरोडा नगरपरिषदेने आपले कौशल्य वापरून निर्णय आपल्या बाजूने खेचून आणला. स्वतःला केजरीवाल समजणाऱ्या जिल्हा परिषदेच्या या प्रामाणिक (?) अधिकाऱ्याची यानंतरही कुंभकर्णी झोप उघडली नाही. या अधिकाऱ्याने या विषयी अपील दाखल करण्याची कारवाई सुद्धा केली नसल्याचे नुकत्याच झालेल्या स्थायी समितीच्या सभेत समोर आले.

एकीकडे जिल्हा परिषदेच्या जागा गोंदिया व तिरोडा नगरपरिषदा गिळंकृत करीत आहेत. त्याठिकाणी व्यापारी संकुल तयार करून कोट्यवधीचा महसूल प्राप्त करीत आहेत. पण गलेलठ्ठ पगार घेणारे पंचायत विभागाचे अधिकारी मात्र घोंगडे पांघरून मलई खाण्यात धन्यता मानत आहेत. त्यातही खुद्द शासनाचे निर्देश असताना हुशार व भविष्यात आयएएस होऊ पाहणारे अधिकारी मिळूनही जिल्हा परिषदेच्या मालमत्तेची खुलेआम लूट होत आहे, हे समजण्यापलिकडचे नक्कीच नाही. हुश्शार अधिकारी असतानाही पंचायत विभागाला अपयश आलेच कसे? याचेच आश्चर्य वाटते. त्यातही कर्तव्यदक्ष सीईओ जिल्हा परिषदेला मिळालेले असताना एकही कोर्टातील निकाल जिल्हा परिषदेच्या बाजूने का लागत नाही? हे सुद्धा कोडेच आहे. जि.प.च्या जागेवर तिरोडा पालिकेने महात्मा गांधी यांचा पुतळा तयार करून टाकला, तरी हे प्रशासन विकासाच्या बाता कोणत्या तोंडाने मारत आहे, हे कळायला मार्ग नाही.

तिरोडा व गोंदिया येथील आमदारांच्या मदतीने तेथील नगरपरिषदांनी जिल्हा परिषदेच्या महत्त्वाच्या जागांवर अतिक्रमण केले. या आमदार महोदयांच्या आशीर्वादाने ग्रामीण जनतेला वाकुल्या दाखविल्या जात आहेत. एवढेच नव्हे तर ग्रामीण जनतेच्या हक्काची असलेली जिल्हा परिषद आम्ही शहरातील आमदार जसे म्हणू,तशी कधीही तोडू शकतो, हे या दोन्ही आजी माजी आमदारांनी सत्तेच्या मग्रुरीत सामान्यांना दाखवून दिले आहे.

जिल्हा परिषदेची मालमत्ता कुठे आहे? तत्कालीन जिल्हा परिषद सदस्यांनी भंडारा जिल्हा परिषदेकडून मालमत्तेची माहिती घेण्याचा मुद्दा उपस्थित केला होता. जिल्हा परिषदेत रजनी नागपुरे व चंद्रशेखर ठवरे हे अध्यक्ष असताना त्यांच्या कार्यकाळात जिल्हा परिषदेच्या स्थायी व सर्वसाधारण सभेत तत्कालीन सदस्य पी. जी. कटरे, गंगाधर परशुरामकर, अशोक लंजे, जगदीश येरोला, नरेश भेंडारकर आदी सदस्यांनी जिल्हा परिषदेची मालमत्ता शोधून त्या जागेचा चांगल्या कामासाठी उपयोग करण्याचा मुद्दा उपस्थित केला होता.

त्यानंतर सेवानिवृत्त अधिकारी नेमण्यावर चर्चा झाली. परंतु, पुढे काहीही सरकलेच नाही. यावरून त्या वेळेपासून पंचायत विभागाला जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात कुठे कुठे जागा आहे? हे शोधण्याचे निर्देश दिल्यानंतरही पंचायत विभागाची झोप मात्र अद्याप उघडलेली दिसत नाही. त्यानंतर सत्तेवर आलेल्या पदाधिकाऱ्यांनी तत्कालीन जि.प.सदस्य राजेश चतुर यांच्या नेतृत्वात समिती नेमली. पण त्या समितीने काय केले? हे कोणालाही कळू शकले नाही. अर्जुनी मोरगाव व तिरोडा तालुक्यातील माहिती आपणास मिळाली नसून इतर तालुक्यातील माहिती मिळाल्याचे सांगून मालमत्तेचा शोध घेण्यासाठी आपण पाठपुरावा केल्याचे दाखविले.याउलट आमदार व खासदारांच्या राजकीय दबावामध्ये जिल्हा परिषदेच्या जागा व इमारती या विविध विभागांना कवडीमोल भावाने देण्याचा सपाटा जिल्हा परिषदेने लावला. उर्वरित जागेवर अतिक्रमणकर्त्यांनी आपली दुकानदारी सुरू केल्याने ती जागा त्यांच्या घशात गेली आहे. अतिक्रमणकर्त्यांना हटविण्यासाठी नोटीस दिल्यावर मात्र काही अतिक्रमणकर्त्यांचे आमदारमंडळी समर्थन करीत असल्याचे चित्र असल्याने जिल्हा परिषदेची मालमत्ता ही अतिक्रमणकर्त्यांच्या घशात जावी, अशीच इच्छा राजकीय नेत्यांची दिसून येत आहे.



तिरोडा येथे पोलिस स्टेशनसमोरील गट क्रमांक ९६ मध्ये ०.४४ हेक्टर जागा ही जिल्हा परिषदेच्या मालकीची आहे. त्या जागेवर आधी प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत होती. ती आता मोडकळीस आली आहे. अर्जुनी मोरगाव येथे गट क्रमांक ३५२,२८४,२८२ मध्ये जिल्हा परिषदेच्या मालकीची जागा असून येथील काही जागेवर अतिक्रमण करण्यात आले आहे. देवरी येथे महामार्गाला लागून असलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या परिसरातील ८० मीटर जागा अतिक्रमणाच्या विळख्यात जाण्याच्या तयारीत आहे. गोंदिया तालुक्यातील काटी येथे भूमापन क्रमांक ७८४, सीट क्रमांक २० मध्ये असलेली १५३.०० चौ.मी.जागेवर १९६२मध्ये इमारत बांधण्यात आली होती. परंतु, मोडकळीस आलेल्या जागेवर जिल्हा परिषदेने आरोग्य केंद्र व इतर विभागाचे बांधकाम करण्याऐवजी राजकीय दबावात काटी येथील पोलिस ठाण्यासाठी देण्यास २३ सप्टेंबर २००८ ला मंजुरी दिली. एकीकडे जिल्हा परिषदेच्या आरोग्य केंद्र व पशुसंवर्धन विभागासह इतर दवाखान्यांसाठी व त्या कर्मचाऱ्यांची निवासस्थाने बांधण्यासाठी जागा मिळत नाही. परंतु, एखाद्या राजकीय नेत्याने दबाव टाकला की, गोंदिया जिल्हा परिषद नांगी टाकून ती जागा त्यांच्या मर्जीच्या विभागाला देत असल्याचा प्रकारामध्ये सातत्याने वाढ होत आहे. जिल्हा परिषदेसारख्या स्वायत्त संस्थेवर आमदार,खासदारच वर्चस्व गाजवून आपल्या सोयीने जिल्हा परिषदेच्या जागेची विल्हेवाट लावतात की काय? असे म्हणण्याची वेळ आली आहे. गोरेगाव येथील शहीद जाम्या तिम्या जिल्हा परिषद हायस्कूलच्या सुरक्षा भिंतीशेजारी असलेल्या जागेवर काहींनी अतिक्रमण करून दुकाने थाटली. परंतु, ती हटवून त्या ठिकाणी जिल्हा परिषदेच्या मालकीची दुकाने तयार करून ती विकून उत्पन्नाची साधने तयार करण्यासाठी नियोजनाचा आराखडा तर सोडा, किती जागा अतिक्रमणाच्या विळख्यात आहे व जिल्हा परिषदेची मालमत्ता किती आहे? हेसुद्धा अद्याप पंचायत विभागाला माहीत नसल्याने या विभागाचे लक्ष कुठे आहे?

## चिचगड वनपरिक्षेत्रात जंगली हत्तींचा धुमाकूळ




**चिचगड–** चिचगड वनपरिक्षेत्रापासून २० किलोमीटर अंतरावरील चिमणटोला गावांमध्ये रात्रीला जंगली हत्तीनी येऊन शेतामध्ये ठेवलेल्या धानाच्या पुंजण्याचे नुकसान केल्याची घटना आज गुरुवारला उघडकीस आली.हे जंगली हत्ती गावाच्या सिमेपासून २०० ते ३०० फूट अंतराव येऊन काही वेळ थांबल्यानंतर परत जंगलाच्या दिशेने निघून गेले.पण ते कधी पुन्हा येणार याची काही शाश्वती नाही.घटनेची माहिती मिळताच चिचगड वनपरिक्षेत्राधिकारी संगिता ढोबळे यांनी चिमणटोला गावाला आपल्या चमूसह भेट दिली.तसेच नुकसानीचे पंचनामे करुन जनतेला रात्री घराबाहेर न पडण्याच्या सुचना दिल्या.

## पालिकेच्या दुकान गाळ्यांची व्हावी चौकशी

**गोंदिया:** राज्य शासनाच्या योजनेनुरूप शहर व ग्रामीण भागात असलेल्या दुर्बल घटकातील नागरिकांचे आर्थिक उत्पन्न वाढावे, यासाठी दुकान गाळे उपलब्ध करून देण्यात येतात. ग्रामीण भागात अनेक गावात या दुकान गाळ्यांमुळे अनेकांना हक्काचा रोजगार उपलब्ध झाला. मात्र या दुकान गाळ्यांचा दुरूपयोगही होत असल्याचे एकोडी येथील प्रकरणावरून समोर आले. त्यातच गोंदिया नगर पालिका क्षेत्राचा विचार केल्यास शहरात अनेक दुकान गाळे या घटकातील नागरिकांसाठी तयार करण्यात आले. मात्र, या दुकान गाळ्यांवर अनेकांनी व्यवसाय सुरू केला असून अनेक गाळे मालक दुकान विक्री करून किंवा भाड्याने देऊन दुकान गाळ्याच्या नावावर गौरखधंदा करीत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे.

गोंदिया पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या ग्राम पंचायत एकोडी येथे दुकान गाळे वाटपाला घेवून गावकऱ्यांमध्ये रोष दिसून येत आहे. दुकान गाळे मिळावे, यासाठी अर्ज केलेल्या नागरिकांना दुकान गाळ्यांसाठी अटी व शर्तीचे पालन करणे गरजेचे होते. त्यानुसार ज्या अर्जदाराला दुकान गाळे मिळाले त्याने स्वत: व्यवसाय करावे, ते दुकान इतरांना देऊ नये. अन्यथा, दुकान गाळे रद्द करण्यात येणार, अशी सुचनाही देण्यात आली होती. पण हा प्रकार होत असूनही ग्राम पंचायत कारवाई का करीत नाही?



यासाठी एकोडी ग्रामवासीनी ७ नोव्हेंबर रोजी एक दिवसीय धरणे आंदोलन केले. दरम्यान त्यांच्या मागण्या करीत तीन दुकान गाडे रद्द करण्यात आले.

सविस्तर असे की, दुकान गाळे आपल्याला मिळावेत म्हणून पालिका क्षेत्रातील अनेक नागरिकांनी राजकीय प्रभावाचा वापर करुन ते दुकान गाळे आपल्या नावावर करुन घेतले. नियम व अटी–शर्तीनुसार हे दुकान गाळे दुर्बल घटकातील नागरिकांना मिळावे, असे आहे. काहींनी या घटकातील नागरिकांना हाताशी धरुण ते दुकान गाळे मिळवून घेतले. मात्र त्यानंतर त्या दुकान गाळ्यांवर ते व्यक्ती फक्त नाव–पुरतेच राहत असल्याचे दिसून आले. आजही गोंदिया नगरपालिका क्षेत्रात रामनगर, यादव चौक, जयस्तंभ चौक, कृषी उत्पन्न बाजार समिती, मुख्य बाजार परिसर अशा अनेक ठिकाणी पालिकेचे दुकान गाळे आहेत. या दुकान गाळ्यांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधीही निर्माण झाल्या. मात्र ज्या घटकासाठी किंवा ज्या व्यक्तीसाठी हे दुकान गाळे आवंटीत करण्यात आले, ते दुकान गाळे खरोखर तो व्यक्ती चालवित आहे की नाही, याची सहनिशा करणेही आवश्यक झाले आहे. विशेष म्हणजे, या दुकान गाळ्यांची खरेदी विक्री होत असल्याचेही प्रकरण शहरात यापूर्वी आताही सुरूआहेत. मौक्याचे ठिकाणचे दुकान गाळे २० ते २५ लाखापर्यंत विक्री झाल्याचेही समोर आले आहे. असे असतांनाही पालिका प्रशासन मात्र नाममात्र शुल्कावर आजही हे दुकान गाळे चालवित आहेत. त्यामुळे पालिका प्रशासनाने त्यांच्या अधिनस्त असलेल्या, शहरातील प्रत्येत दुकान गाळ्यांची चौकशी करून ते दुकान गाळे गरजू लाभार्थ्यांच्या अधिकार क्षेत्रात आहेत की नाही, याची तपासणी करणे आवश्यक झाले आहे. तसेच ते दुकान गाळे त्या व्यक्तीच्या ताब्यात नसल्यास ते दुकान गाळे रद्द करून खऱ्या लाभार्थ्यांना ते गाळे दण्यात यावे, अशी मागणी वंचित लाभाथी करू लागले आहेत.

## पंचायत समिती सदस्यांचा मासिक सभेवर बहिष्कार

### विभाग प्रमुखच मारतात सभेला दांडी : कर्मचारी, पदाधिकाऱ्यांतील वाद चव्हाट्यावर

**अर्जुनी मोरगाव:** पं.स. माफ'त ७१ ग्रामपंचायत अंतर्गत शेकडो गावांत विकासाची गंगा पोहोचवली जाते.लोकांपर्यंत विकास पोहचावा, जनतेची कामे व्हावी, वैयक्तिक व सार्वजनिक हिताची कामे व तालुक्याचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सभापती, उपसभापती सह १४ पदाधिकारी आहेत. विविध योजना, जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी दरमहिण्याला मासीक सभेचे आयोजन केले जाते. मात्र अशा महत्वाच्या मासीक सभेला पंचायत समितीमधील अधिनिस्त विविध विभागाचे विभागप्रमुखच गैरहजर असतात, तर सभा घ्यायची कशीया कारणावरून आज शुक्रवारी आयोजित सभेला सभापती, उपसभापतींसह सर्व सदस्यांनी बहिष्कार टाकला. यावरून अधिकारी,पधाधिकारी यांच्यातील वाद चव्हाट्यावर आला.

शुक्रवारी पंचायत समितीची मासिक सभा उमेद सभागृहात आयोजित करण्यात आली होती. पदाधिकारी नवनिर्वाचित असून ही सातवी सभा होती. अल्पावधीतच सभेवर पदाधिकाऱ्यांनी बहिष्कार घालणे म्हणजे पदाधिकारी, अधिकारी यांच्यातील समन्वयाचा अभाव स्पष्ट दिसतो. मासिक सभेची माहीती जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्याधिकारी यांना माहिती दिली जाते. मासीक सभेला सर्व अधिकारी, पदाधिकारी उपस्थित असणे क्रमप्राप्त आहे. सभेत मागील सभेचे कार्यावृत्त वाचून कायम करणे,पदाधिकारी यांचे प्रश्नांना उत्तरे देवून समाधान करणे, शासनाच्या नवनवीन योजना व परिपत्रकाचे वाचन करणे असे अनेक प्रकारचे विषय सभेत चर्चेला येतात. मात्र सभेला अनेक विभाग प्रमुख दांडी मारतात. प्रतिनिधी पाठवत नाही. विभागप्रमुखांना आपल्या विभागाचा आढावा सादर करावा लागतो. विभाग प्रमुख किंवा प्रतिनिधी उपस्थित नसतील तर सभा कशासाठी? जाब विचारायचा कुणाला? यावरून सर्व सदस्यांनी मासिक सभेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आणि सभात्याग केला. अनेकदा काही विभाग प्रमुख सभागृहात चर्चा झाल्याबरोबर निघून जातात, असा आरोप सदस्यांनी केला. मासीक सभेवर बहिष्कार आणि सभात्याग ही तालुक्यातील पहिली घटना असावी. पंचायत समिती सदस्यांचा सभात्याग हा तालुक्यात चर्चेचा विषय बनला आहे. विभाग प्रमुख आणि प्रतिनिधी संबधाने मासीक सभेत गटविकास अधिकारी यांना जाब विचारल्यास दरवेळी गटविकास अधिकारी स्मित हास्य करुन वेळ मारुन नेतात असाही आरोप सदस्यांनी केला.या प्रकरणावरून पंचायत समितीचे अधिकारी मस्तवाल आणि सैराट झाल्याच्या चर्चा आहेत. माजी सभापतीच्या काळात कुठल्याही विभागाचा कर्मचारी सभापतीच्या परवानगी शिवाय कार्यालय सोडत नव्हते.हा इतिहास आहे.

**सहाय्यक खंड विकास अधिकारी यांना सभागृहात यायला उशीर झाला. काही विभाग प्रमुख हजर होते काही उशिरा आले. पंचायत समिती सदस्यांना कामानिमित्त बाहेर जायचे होते. या कारणास्तव सर्व सदस्यांनी सभात्याग केला.**

**विलास निमजे, प्रभारी गटविकास अधिकारी**

## नक्षलवाद्यांची वन कर्मचाऱ्यांना धमकी:वृक्ष लागवड केली तर

**गडचिरोली :** सिरोंचा तालुक्यातील झिंगानूर परिसरात वन कर्मचाऱ्यांकडून केल्या जात असलेल्या वृक्षलागवडीला नक्षलवाद्यांनी विरोध दर्शवत हे काम करणाऱ्या वन कर्मचाऱ्यांना जिवाला मुकावे लागेल, अशी धमकी पत्रकांमधून दिली आहे.गावातील आंबेडकर चौक परिसरात ही लाल शाईने लिहिलेली पत्रके आढळून आली आहेत. त्यात वनविभागाबद्दल रोष व्यक्त करण्यात आला. वनविभागाची दादागिरी बंद करा, वनविभाग गरीब लोकांच्या जमिनीवर वृक्षलागवड करत आहे.

ही दादागिरी बंद केली नाही तर मृत्युदंड दिला जाईल, असा मजकूर भाकपा (माओवादी) यांच्या नावे काढलेल्या त्या पत्रकांमध्ये आहे.




त्यामुळे वन कर्मचाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. बऱ्याच वर्षांनंतर नक्षलवाद्यांनी वन विभागाविरोधात पत्रक काढल्याने परिसरात विविध चर्चांना ऊत आला आहे. गेल्या काही महिन्यांपासून सिरोंचा वनविभागात अवैध वृक्षतोड आणि तस्करी होत असल्याचे काही प्रकरणे समोर आली होती.

## भागी/शि.सिरेगावबांध ग्रामपंचायतीची राज्यस्तरीय समीतीकडून तपासणी



### ★संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत
### ★राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा
### ★राज्यातील १३ ग्रामपंचायतीची होणार तपासणी

**गोंदिया:** पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा सन २०१८–१९ या वर्षातील राज्यस्तरीय तपासणी दिनांक ७ नोव्हेंबर रोजी देवरी तालुक्यातील भागी/शि व ८ नोव्हेंबर रोजी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील शिरेगावबांध येथे पार पडली.

तपासणीकरीता राज्यस्तरीय समिती अध्यक्षांचे प्रतिनिधी तथा पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे अवर सचिव चंद्रकांत मोरे, समितीचे सदस्य तथा पाणी पुरवठा विभागाचे कक्ष अधिकारी बाळासाहेब हजारे, समिती सदस्य तथा पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे सहायक कक्ष अधिकारी रमेश पात्रे यांची उपस्थिती होती. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषदेच्या वतीने संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा (सन २०१८–१९) मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात आले.

७ नोव्हेंबर रोजी देवरी तालुक्यातील भागी/शि या ग्रामपंचायतीची तपासणी करण्यात आली. आदिवासी बहुल असलेल्या या गावात गावाच्या वेशीपासून गोंडी नृत्याची झलक दाखवून समितीचे स्वागत करण्यात आले. संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला तसेच बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून तपासणीला सुरुवात करण्यात आली.

यावेळी राज्यस्तरीय तपासणी समितीचे अध्यक्ष व सदस्य, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता नरेश भांडारकर, गटविकास अधिकारी देवरी दीपक ढोरे, सरपंच धनराज कोरोंडे, विस्तार अधिकारी पराते, ग्रामसेवक वाघमारे, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे भागचंद्र रहांगडाले, सूर्यकांत रहमत्कर, अतुल गजभिये, विशाल मेश्राम, गट समन्वयक भिमराज पारधी, गट शिक्षणाधिकारी, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, विविध समित्यांचे पदाधिकारी, शिक्षक, आरोग्य विभाग, शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

८ नोव्हेंबर रोजी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सिरेगावबांध या ग्रामपंचायतीची तपासणी करण्यात आली. गावाच्या वेशीपासून राष्ट्रसंताच्या भजनाने सर्व गावकऱ्यांच्या उपस्थितीत समितीचे ग्रामपंचायत परिसरात आगमन झाले.

समितीच्या वतीने दोन्ही गावात पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापन, शौचालय व्यवस्थापन, सांडपाणी व घन कचरा व्यवस्थापन, परिसर स्वच्छता, शाळा व आंगणवाडी, लोकसहभाग आदी घटकांची तपासणी करण्यात आली.

सिरेगावबांध येथे समिती अध्यक्ष व सदस्य यांच्यासह गटविकास अधिकारी विलास निमजे, जिल्हा परिषद सदस्या रचना गहाने, पंचायत समिती सदस्या, माजी सरपंच हेमकृष्ण कापगते, सहायक गटविकास अधिकारी अरुण गिरहेपुंजे, विस्तार अधिकारी सिंगणजुडे, ग्रामपंचायत प्रशासक बंडगर, विस्तार अधिकारी ब्राह्मणकर, विस्तार अधिकारी आरोग्य मोरेश्वर धोंगडे, ग्रामसेवक समीर रहांगडाले, जिल्हा पाणी व स्वच्छता कक्षाचे भागचंद्र रहांगडाले, अतुल गजभिये, दिशा मेश्राम यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी, विविध समित्यांचे पदाधिकारी, शिक्षक व आंगणवडी सेविका, गट समन्वयक हेमराज अंबुले, समूह समन्वयक उमेंद्र भगत यांच्यासह पंचायत समिती पातळीवरील विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

राज्यस्तरीय समिती अध्यक्षांचे प्रतिनिधी चंद्रकांत मोरे, समिती सदस्य सचिव बाळासाहेब हजारे, समिती सदस्य राजेश पात्रे यांचा दोन्ही गावात शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

राज्यातून १४ ग्रामपंचायती ठरल्या होत्या राज्यस्तरीय तपासणीसाठी पात्र सन २०१८–१९ या वर्षांत जिल्हास्तरीय तपासणी करण्यात येऊन प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या प्रत्येक जिल्ह्यातून दोन ग्रामपंचायती या विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरल्या होत्या. त्यानंतर विभागीय तपासणीत प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या ग्रामपंचायती या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरल्या होत्या. राज्यस्तरीय स्पर्धेत कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व अमरावती या सहा विभागातून १४ ग्राम पंचायती राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरल्या होत्या. नागपूर विभागातून कामठी तालुक्यातील महालगावं तसेच गोंदिया जिल्ह्यातून भागी व सिरेगावबांध या दोन्ही ग्रामपंचायती राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरल्या होत्या.

## खंडणी प्रकरणात चार आरोपींना अटक

**गोंदिया:–**मुलाचे अपहरण करुन जीवाने मारण्याची भीती दाखवून ५ लाखाची खंडणी घेणाऱ्या चार आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने नागपूर येथून अटक केली. प्रकाश हनसलाल टेंभरे (२८), धम्मदिप मोहनलाल वासनिक (३२), चंद्रशेखर मधुकर साठवणे (२७) व गगन तेजराम भगत (२४) सर्व रा.गोंदिया अशी आरोपींची नाव आहे.स्थानिक सेलटॅक्स वसाहतीमध्ये एका भाड्याच्या खोलीत गौरव संतोष बेदरे रा. भानेगाव, जिल्हा यांच्या लहान भाऊ व त्याच्या चार मित्रांना राहत होते.५ नोव्हेंबर रोजी चार आरोपींनी गौरव बेंदरेच्या भाऊ व त्यांच्या मित्रांना बेदम मारहाण केली. तसेच गौरवच्या वडीलांना ५ लाख रुपयाची मागणी केली व पैसे न दिल्यास मुलाचे अपहरण करुन त्याला ठार मारण्याची धमकी फोनवरुन दिली. दरम्यान मुलाच्या जीवाच्या भीतीने त्याच्या वडीलांनी आरोपींना ५ लाख रुपये दिले. पैसे मिळताच आरोपी फरार झाले. याप्रकरणी गोंदिया ग्रामीण पोलिस ठाण्यात कलम ३६४(अ), ३८६,४५२, ३४२, ३२७, ३२३, भादंविअन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.दरम्यान ग्रामीण पोलिस व स्थानिक गुन्हे (youth kidnapped)शाखा पथक आरोपीचा शोध घेत असताना प्रकरणातील आरोपी हे नागपूर येथील कपिलनगर येथे असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे स्थागुशा पोलिसांनी चारही आरोपींना नागपूर येथून अटक केली.



चारही आरोपींनी गुन्हा केला असून त्यांना ग्रामीण पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. पुढील तपास पोनि अजय भुसारी यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलिस निरीक्षक आसाराम चव्हाण हे करीत आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे यांच्या निर्देशान्वये अपर पोलिस अधीक्षक अशोक बनकर, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील ताजने व स्थागुशाचे पोनि बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनात व नेतृत्वात पोउपनि विघ्ने, पोहवा. विठ्ठल ठाकरे, पोशि विजय मानकर, संतोष केदार, चापोशी मुरमुली पांडे व तांत्रिक सायबर शाखेचे सपोनि. महादेव शिद,पोहवा दीक्षित दमाहे, धनंजय शेंडे यांनी केली.